MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष अकरावे / अंक ३ / फेब्रुवारी २०१०

## संपादकीय

## सुरुवात स्वत:पासून करू या!

शिक्षण म्हणजे नक्की काय, हे आज कळेनासे झाले आहे. एखादी संकल्पना जेव्हा नेमकेपणाने सांगता येत नाही, तेव्हा तिचे वर्णन करू पाहणाऱ्या अनेक व्याख्या प्रचारात येतात. भारत हा एक अतिप्राचीन देश असून या देशात मानवी जीवनाच्या शृंगारापासून ते शिक्षणापर्यंतच्या अनेक कंगोऱ्यांवर लिखाण झालेले आपण पाहतो. जीवनाचा नेमका अर्थ काय, ते जगायचे कशासाठी अशा अनेक मूलभूत प्रश्नांवर साधकबाधक चर्चाही यामध्ये मोठ्या प्रमाणात झालेली आपल्याला आढळते.

तत्त्वज्ञानातून स्फुरलेले हे विचार साहित्य, कला, धर्म, शिल्प या सर्वांत पाझरलेले दिस. व्यक्ती, कुटुंब, समाज या सर्वांचे अस्तित्व मान्य करून, या सर्व घटकांना योग्य ते स्वातंत्र्य मिळूनही त्यांचे परस्परसंबंध सुरक्षित करण्याचा प्रयत्न सातत्याने झालेला दिसतो. या रचनेमध्ये स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, नागरी-ग्रामीण, सुशिक्षित-अशिक्षित, सुसंस्कृत-असंस्कृत अशा भेदांतून अस्तित्वात येणारे वास्तव नाकारलेलेही दिसत नाही. या भेदांपैकी स्त्री-पुरुष हे भेद वगळता, बाकीचे भेद हे व्यापकतेने सांस्कृतिक आहेत. त्यांना आपले असे अंगभूत फायदेतोटेही आहेत. व्यापक अशा समाजाची रचनात्मक व्यवस्था करताना यामध्ये संतुलन साधण्याचा प्रयत्न केलेला असतो. हे सर्व चलनवलन एका मोठ्या काळ, वेळ व भौगोलिकता या पार्श्वभूमीवर (कॅनव्हास) शतकानुशतके चालू आहे. हे अशा संतुलित स्वरूपात चालू राहण्याकरता प्रत्येक घटकाला काही नियमांचे पालन करावे लागते. त्यात मोठ्या प्रमाणावरती देवाणघेवाण तर असतेच, पण अनेक नियम असे असतात की त्यांचा लगेचच व व्यक्त स्वरूपात फायदा असतोच असे नाही.

चांगल्या, सकस, समतोल आहाराचे बालवयात सेवन केले तर उतार वयात त्याचा शरीराला फायदा होतो, हे अनुभवातून प्राप्त झालेले ज्ञान असते. सकस अन्न म्हणजे नेमके कोणते अन्न हे देखील अनुभवांतूनच समजते. त्या अन्नाच्या चवीपेक्षा पोषणमूल्ये अधिक महत्त्वाची असतात, हे समजण्याची क्षमता बालवयात नसते. त्या वयात आहारविषयक काही नियमांचे पालन करणे एवढेच अपेक्षित असते. वय वाढते तसे व्यक्तीच्या समजण्याच्या क्षमताही वाढत असतात व हळू हळू अशा आहाराचा फायदा लक्षात येण्यास सुरुवात होते. यामध्ये महत्त्वाचा मुद्दा हाच आहे

(पृष्ठ क्रमांक ४० वर)

# पसायदान



आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।। १ ।।
जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।।२ ।।
दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।। ४ ।।
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते ते अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७ ।।
आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें । हो आवें जी ।। ८ ।।
येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ।। ९ ।।

## ❈ सार्थ पसायदान ❈

आता यावर विश्व स्वरूप, सद्गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)




**वर्ष अकरावे / अंक ३ / फेब्रुवारी २०१०**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ८ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | उपनिषदातील विचार (लेखांक - ३ रा) | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | ८ |
| ३) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | १७ |
| ४) | धर्म, संस्कृती आणि विज्ञान | डॉ. विजय बेडेकर | २२ |
| ५) | 'दिशा' सूची २००९ (वर्ष १०) | श्री. सचिन गराटे | २६ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/–**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/– फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# उपनिषदातील विचार
## (लेखांक - ३ ग)

*उपनिषदांसंदर्भातील लेखमालेतील हा पुढील लेख. यात प्रामुख्याने 'माया' विचार मांडण्यात आला आहे. - संपादक*

**आनंद स्वरूप ब्रह्म :**

आनंद हा ब्रह्माचा गुणधर्म नसून ब्रह्मच आहे. न तु ज्ञानात् भिन्नं सुखं अस्ति। आनंद हे सर्वांनाच व्यापून राहिले आहे. त्याशिवाय मानवाचे जीवनच उद्ध्वस्त झाले असते. आनंदाची गोडी असल्यामुळेच मानवाला सुख अनुभवता येते. कोणत्याही कल्पनेन ब्रह्मानंदाचे मोजमाप करता येत नाही. गाढ निद्रेत मानव सर्व कल्पनांपासून (पाप-पुण्य, वासना, भीती) मुक्त असतो. परंतु ती तात्पुरती गोष्ट आहे. त्याला शाश्वत स्वरूपाचे दर्शन म्हणता येणार नाही. कारण जागृत झाल्याबरोबर तो द्वंद्वात्मक भूमिकेवर येतो. मात्र अध्यात्मिक उपासनेच्या द्वारे तो ब्रह्मज्ञान मिळवू शकतो. हे शाश्वत स्वरूपाचे असते. कोणताही अडथळा निर्माण न होता अक्षय स्वरूपाचा आनंद मानवाला अनुभवता येतो. योग प्रक्रियेने हे प्रत्येकालाच प्राप्त करून घेता येते.

**आत्मउपासना :**

उपनिषदात प्रणवासंबधी विचार करताना साक्षात् कारितेचा तो एक उपाय आहे असे प्रतिपादिले आहे. प्रणव म्हणजे ओंकार, एकाक्षरी ब्रह्म होय. ॐ इति एकाक्षरं ब्रह्म। प्रणवाच्या विशिष्ट उच्चारातच मंत्र शक्ती दडलेली आहे. हा साधा मंत्र नाही. याची व्याप्ती अमर्याद अशी आहे. हा मूळ मंत्र आहे. जीवात्मा आणि निसर्ग याशी परिणामकारक असा हा मंत्र आहे. या मंत्राचे जीवात्म्याला परमात्याशी अनुसंधान ठेवता येते. आत्म विकासाचा मार्ग या मंत्राने मोकळा होतो. संपूर्ण माडुक्य उपनिषद् या मंत्राच्या विश्लेषणासाठी खर्ची घातलेले आहे. यातील काही उल्लेख समजण्यास अगर आकलन करण्यास अवघड आहेत. त्यासाठी तत्त्वज्ञानाचा खोल परिचय आवश्यक आहे. इतर काही उपनिषदांतूनही प्रणवाबद्दल बरेचसे सांगितले आहे. इतका प्रणव मंत्र महत्त्वाचा आहे. उपनिषद काळी गुरू शिष्याला यातील रहस्य, विविध पद्धतीने समजावून देत असत. कठोपनिषदात यमदेव गुरुच्या भूमिकेत आहे आणि नचिकेताला या विषयी समजावून सांगत आहे.

'सर्वे वेदा यत् पदं आमनन्ति।
तपांसि सर्वाणिच यत् वदन्ति ।
यत् इच्छन्त: ब्रह्मचर्यं चरन्ति ।
तत् ते पदं संग्रहेण ब्र्वामि ।

१.२.१५

या श्लोकाचा अर्थ - साऱ्या वेदांत ज्याची स्तुती आढळते, प्रारंभी शुभारंभी ज्या शब्दाचे उच्चारण आवर्जून केले जाते, ज्यासाठी साधक ब्रह्मचर्य व्रत धारण करून तो मंत्र समजून घेण्याचा प्रयत्न करतात. त्याबद्दल मी थोडक्यात तुला कथन करतो.तो शब्द म्हणजे ॐ होय.

एतत् हि एव अक्षरं ब्रह्म एतत् हि एव अक्षरं परम् ।
एतत् हि एवं अक्षरं ज्ञात्वा यो यत् इच्छति तस्यतत् ।

कठ १. २. १६

याचा अर्थ - ॐकार हा ब्रह्मवाचक आहे, हा

परब्रह्मवाचक आह. जो कोणी यातील रहस्य जाणतो त्यालाच त्याच्या पासून सर्व इच्छा सफल करून घेता येतात. म्हणजेच, यातील अंतर्यामी शक्तीचे ज्याला आकलन झाले त्याला सर्वव्यापकत्व प्राप्त होते.

एतत्‌ आलंबनं श्रेष्ठं एतत्‌ अलांबनं परम्‌।

एतत्‌ अलांबनं ज्ञत्वा ब्रह्मलोके महीयते।

कठ १.२.१७

त्याचा अर्थ - हेच सर्वात उत्तम. हेच सर्वात अंतिम आश्रयस्थान होय. हे ज्याने ओळखले तो ब्रह्मलोकात विराजमान होतो.

श्वेताश्वतर उपनिषदात काही उपमांच्या माध्यमाने हे समजावून दिले गेले आहे व ब्रह्मानुभव कसा घ्यावा याचा उपायही सांगितलेला आहे -

तिलेषु तैलं दधनाच सर्पि: ।

आप स्त्रोत: स्वरणीषुचाग्नि :

एवं आत्मा आत्मानि गृह्यते असौ।

सत्येन एनं तपसा योऽनुपस्यति ।

१.१५

तिळात तेल दुधात लोणी, झऱ्यात पाणी, दोन लाकडांच्या ठोकळ्यात अग्नी अशा प्रकारे परमात्मा अंतर्यामी दडलेला आहे. तो सत्य आणि तप यांच्या द्वारे जीवात्म्याला साक्षात्‌ होतो. म्हणजे जीवात्मा मुक्त होता. यासाठी स्वदेहं अराणिंकृत्वा प्रणवंच उत्तरारणिं। ध्यान निर्मथनाभ्यासत्‌ देवं परणेत्‌ निगूढवत्‌। श्वेता १.१४

स्वत:चे शरीर म्हणजे लाकडी ठोकळ्याचा खालील भाग कल्पून ॐकार हा ठोकळ्याचा वरचा भाग कल्पावा. मग ॐकारावर लक्ष केंद्रित करून ब्रह्माचे ध्यान करावे. दोन ठोकळ्यांच्या मंथनातून जसा अग्नी प्रकट होतो. त्याच पद्धतीने इथे ब्रह्म प्रगट होते. अशा प्रकारे ब्रह्मप्राप्तीचा मार्ग समजावून देण्यात आलेला आहे. केवळ ब्रह्म संकल्पना मांडून उपनिषदे थांबलेली नाहीत. ती प्रत्यक्ष अनुभवता कशी येईल याचाही विचार मांडलेला आहे आणि गुरुशिष्य संवाद पद्धतीने समजावून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**माया शब्दाचा उगम :**

ऋग्वेदात माया शब्द आला आहे. तो शब्द शक्ती, इंद्रजाल या अर्थी योजलेला आहे. इंद्रो मायभि: पुरुरूप ईयते। इंद्र आपल्या मायाजालाने विविध प्रकारची रूपे धारण करतो. ही आत्मिक शक्ती या स्वरूपात इथे वर्णन केले आहे. पुढील काळात हीच कल्पना विस्तारित झाली. व्यास, गौडपाद, शंकराचार्य इत्यादींनी याला तर्कशुद्धता प्राप्त करून दिली. आणि पद्धतशीरपणे वेदान्तात हा शब्द रूढ केला. ऋग्वेदात दोन कल्पना ठळकपणे आढळतात. द्वंद्व आणि निर्द्वंद्व. द्वंद्व म्हणजे विविध, अनेक हिचे स्वरून अशाश्वत असून निर्द्वंद्वच - ब्रह्मच - शाश्वत स्वरूपाचे आहे असे म्हटले आहे. शाश्वत प्राप्त करणे हेच मनुष्याचे कर्तव्य ठरते.

**उपनिषदातील माया विचाार :**

विश्वाचे मूळ शोधून काढण्याचा पद्धतशीर प्रयत्न उपनिषदातून केलेला आढळतो. पदार्थ आपल्याला कसे दिसतात याची कल्पना सर्व प्रकारच्या अंतर व बाह्य जाणिवेमुळे ध्यानात येते, पण तसे ते का आहेत हे मात्र ध्यानात येत नाही. कारण केवळ इंद्रियानीच ध्यानात येणाऱ्या आणि स्थळकाळ मर्यादित वस्तूत ते बल आढळत नाही. म्हणून उपनिषदात असे म्हटले जाते की विश्व ही माया आहे. हे व्यावहारिक स्वरूपाचे ज्ञान आहे. परा म्हणजे श्रेष्ठ प्रकारचा बोध वस्तूतून होत नाही. व्यावहारिकपणा हा वस्तु बोधाच्या अज्ञानावर आधारित असतो. जे ज्ञान आत्मवस्तूचा बोध करून देत नाही त्या

सर्व प्रकारच्या ज्ञानाला ऋषींनी अनात्म मानले आणि त्याला बाजूला सारले. सर्वत्र आणि सर्व काळ असणोर आत्मतत्त्वच स्थळकाल यापेक्षाही व्यापक आणि श्रेठ असून तेच पूर्ण अविभाज्य धान्यातील बीजासारखे अत्यंत सूक्ष्म असे मानवाच्या अंतर्यामी आहे. वैश्विक ब्रह्म आणि आत्मिक जीव एकच होत. आत्मतत्त्व म्हणजे अंतर्यामी असलेली जाणीव होय. या जाणिवेनेच सारी इंद्रिये प्रकाशित होतात. सारे ब्रह्मांड, सारे देव आणि सारे पदार्थ आत्मतत्त्वानेच प्रकाशित होतात. अस्मात्‌ आत्मन: सर्वे प्राणा: सर्वे लोका: सर्वे देवा: सर्वाणि भूतानि व्यचरन्ति। बृ.आ. (२.१.२०) सारे पदार्थ आत्मतत्वानेच प्रकाशित होणारे असल्याने आत्म्याखेरीज म्हणजेच जाणिवेच्या पलीकडे या पदार्थांना काही अर्थच राहत नाही. म्हणून आत्मतत्वाहून वेगळे जे भासते ती माया होय. हीच गोष्ट वारंवार उपनिषदातून सांगण्यात आलली आहे.

**वेदान्तातील मायेचे स्वरूप :**

पुढील काळात मायेचे तत्त्वज्ञान वेदान्तात पद्धतशीर पणाने मांडण्यात आलेले आढळते. मात्र या मायावादावर प्रचंड गैरसमज पसरविण्यात आले आणि याला एक विकृत रूपाने रंगवून याचा विचका केला गेला आहे. वेदान्त तत्त्वज्ञानाबद्दल अनेकांच्या मनात गोंधळ माजवून देण्यात आलेला आहे. यात पौर्वात्य आणि पाश्चिमात्य दोन्ही प्रकारची विद्वान मंडळी सहभागी आहेत. त्यांनी लोकांसमोर असे मांडले की मायावाद स्वीकारला गेला तर विश्व हे असत्य ठरते. विश्वाला अस्तित्वच राहत नाही. अशा परिस्थितीत विश्वातील जीवन दु:खद असून त्याच्या पासून दूर होण्याने सुख प्राप्त होऊ शकेल असे कोणत्या आधारे प्रतिपादिता येईल. हे त्यांचे म्हणणे तार्किक आहे असे म्हणावयास हरकत नाही. परंतु या बाबत वेदान्ताची भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. वेदान्त समजण्यासाठी दोन प्रकारच्या ज्ञानाची आवश्यकता आहे. पहिल्या प्रकारचे ज्ञान हे सापेक्ष स्वरूपाचे आहे तर दुसऱ्या प्रकारचे ज्ञान हे निरपेक्ष स्वरूपाचे आहे. सापेक्ष ज्ञानात स्थळ,काळ, कार्मकारण भाव हे सारे सत्यच मानले गेले आहे. या ज्ञानाने होणारे अनेकत्वाचे अगर नानात्वाचे दर्शन सत्यच ठरते, तसेच पाप,पुण्य, चांगले वाईट, सुख, दु:ख द्वंद्वात्मक ज्ञानही खरेच ठरते. ईश्वर, स्वर्ग, मरणोत्तर जीवन हे सारे सत्यच मानले गेले आहे. स्वर्गप्राप्तीसाठी यज्ञयागादी विधीविधाने ही देखील योग्य मानली गेली आहेत. हे सारे सापेक्ष म्हणजेच व्यावहारिक आहेत. है वदिक ऋषींनी लक्षात घेतलेले आहे. आणि म्हणनूच प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी असणारा वेगळेपणाचा भाव इ. वैश्विक विविधता याचे अवलोकन करून पद्धतशीरपणे ईश्वर नीति, अध्यात्म, तप, पूजा पद्धती म्हणजेच उपासना तसेच वैयक्तिक विकासासाठी चार आश्रम आणि सामाजिक घडण सुव्यवस्थित राहण्यासाठी व सामाजिक संतुलनासाठी वर्ण पद्धती हे सारे निर्माण केले. मानवाला अंतिम सत्यापर्यंत पोचणारा उद्युक्त ठरणाऱ्या साऱ्या गोष्टींची छाननी करून धर्म अर्थ काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ मानवापुढे ठेवले. या पुरुषार्थ प्राप्तीने मानवाचे जीवन संयमी, सुखी, समाधानी आणि आनंदी हाईल अशी योजना त्याद्वारे निर्माण केली. ऋषींनी मुळातच विश्वाचे अस्तित्व अमान्य केले असते तर हे सारे व्यर्थ ठरले असेत. परंतु त्यांना याचा सर्वांशाने बोध झालेला होता. या साऱ्यांची योजना करून त्या गोष्टी कसोशीने रूढ करण्याचाही प्रयत्न केला. कारण व्यावहारिकरीत्याही मानवाला अनुभव आला पाहिजे असेच ते म्हणत. यातील फोलपणा ध्यानात आल्याखेरीज मानव अंतर्मुख होणार नाही. हे ते जाणून होते. म्हणनू ते म्हणते झाले या साऱ्या गोष्टी व्यवहाराच्या पातळीवरच राहतील. सापेक्षच राहतील. यांना अंतिम सत्यता नाही. जोवर यातील वैयर्थ-विफल भाव ध्यानात आलेला नाही तोवर मानव या व्यवहार्य गोष्टीलाच महत्त्व देत रहील. मात्र

एकत्वाचा अनुभव येऊ लागताच आणि निरपेक्ष ज्ञानाचा उदय होऊ लागताच या साऱ्या गोष्टी कोलमडून पडतील. द्वंद्व भूमिका नाहीशी होईल म्हणजे विरून जाईल. इतकेच नव्हे द्वंद्व संबंधीचे विचारही मावळतील. अशा रीतीने या पदार्थामागे दडलेले सत्य काय आहे हे शोधण्याचा प्रयत्न सुरू होईल. वेदान्त ज्ञानाची एक वेगळी दिशा मिळेल आणि अंतिम सत्याकडे वाटचाल सुरू होईल. वेदान्त अंतिम सत्याकडे जाण्याची दिशा दाखवितो. सर्व खलु इदं ब्रह्म। थोडक्यात, सापेक्षतेने होणारे ज्ञान हीच माया. ही माया परमेश्वराची शक्ती असल्याने तिला स्वतंत्र अस्तित्व नाही. मायेचे दोन प्रकार संभवतात. एक आवरण तर दुसरा विक्षेप. गाढ निद्रेत संपूर्ण विश्व विलयन पावते. म्हणजे विश्वसंबंधी जाणीव नाहीशी होते आणि जागृतीतल्या जाणिवेने पुन: ती ते विश्व उद्भासित करते. विलयन पावणे यालाच आवरण म्हणतात व उद्भासित होणे याला विक्षेप म्हणतात. या दोन्ही गोष्टी मायेमुळेच घडतात.

**मायेचा पसारा :**

माया वैश्विक व वैयक्तिक स्तरावरही असू शकते. एकच पदार्थ एकच वा अनेक स्वरूप धारण करू शकते. एकत्वाचा अनुभव समूह वाचकात आणि अनेक व्यक्तिवाचकात होऊ शकतो. उदाहरणार्थ अरण्य हा शब्द समूहवाचक एकत्वाचे दर्शन घडवितो तर अनेक वृक्ष म्हणण्याने व्यक्ति वाचकत्वाने विविधतेचे दर्शन घडते. वैश्विक माया ही ईश्वराशी संबंधित, यालाच सगुण ब्रह्म म्हणतात. अगर उपाधियुक्त ब्रह्म म्हणतात. वैयक्तिक स्तरावरील माया जीवात्म्यांशी निगडित. थोडक्यात दोन्ही स्तरावरील माया ब्रह्माला आवरण घालते. म्हणजेच व्यापक ब्रह्म मर्यादित होते. ईश्वर अगर जीव ब्रह्मच असूनही मर्यादित स्वरूप धारण करतात. मात्र ही मर्यादा जाणिवेपुरतीच असते. हे विसरून चालणार नाही. कारण वस्तुत: ब्रह्म कधीच मर्यादित होऊ शकत नाही. उदाहरणाने हे स्पष्ट करता येईल. आकाश पर्वताच्या शिखरामुळे कडायुक्त असल्यासारखे दिसते. मुळात तसे ते नसते. त्याचप्रमाणे उपाधीमुळे (मायेमुळे) ब्रह्मच दगड, माती, झाडे, पक्षी, प्राणी, मानव, देव, सृष्टी निर्माता इत्यादी असल्याचे प्रत्ययाला येते. उपाधी नाहीशी झाली असता ब्रह्ममूळ स्वरूपात विलसते. ब्रह्मउपाधीने युक्त असल्याचे भान न झाल्यामुळे ते मर्यादितच असल्याचा समज बळावतो. माया म्हणजे विश्व निर्मितीचे उपकरण, परंतु या मायेच्या सान्निध्याने ब्रह्मच विश्वाचा निर्माता असावा असे वाटते. वस्तुत: ते ब्रह्म शुद्ध जाणीव रूप असून विश्वाचे निमित्त कारण आहे. आता या सगुण ब्रह्मातून प्रथम निर्माण झालेले तत्त्व म्हणजे आकाश होय. याच कारणाने मायेमुळे ब्रह्मच आकाश झाले आहे, असे वाटते. आत्मन: आकाश: संभूत:। वेदान्त ज्या ज्यावेळी ब्रह्म हा सृष्टिकर्ता पालनकर्ता आणि संहारकर्ता आहे असे प्रतिपादन करतो त्यावेळी ते वर्णन सगुण ब्रह्माचे असते. ते निर्गुण ब्रह्माचे नसते. हे ध्यानात ठेवीले पाहिजे. रजापासून निर्मिती सालापासून रक्षण आणि तमापासून संहार हे मायेचे कार्य आहे. त्रिमूर्तिंची कल्पनाही यातूनच उदयाला आलेली आहे.

**सगुण ब्रह्माची आवश्यकता :**

ऋषीना सगुण ब्रह्म आवश्यक वाटले कारण माणसाची आध्यात्मिक उन्नती यातून साधता येणे शक्य होते. सगुण ब्रह्मच ध्यानाचा विषय होऊ शकतो. देहधारी मानव अनेक गुणानी युक्त असतो. त्याच्या ठिकाणी प्रेम व द्वेष या दोन्ही गोष्टी आढळतात, त्यामुळे त्याचे मन निर्गुण ब्रह्माकडे वळणे महाकठीण. सगुण ब्रह्मामुळे विश्व नियंता वा जगदीश्वर निश्चित करता येतो. म्हणून ब्रह्म विश्वमय आहे ही कल्पना मानवाला समजणे सोपे जाते. विश्वमयता हा सापेक्ष भाव आहे. ब्रह्मापासून उत्पत्ति स्थिती आणि लय संभवतात याचे वर्ण तैत्तिरीय उपनिषदात स्पष्टरीत्या केले आहे. 'यतो वा इमानि भूतानि

जायंते । येन जातानि जीवन्ति, यस्मिन्, प्रेत्य अभिसंविशन्ति, तत् विजिज्ञासस्व तत् ब्रह्म। हीच कल्पना जन्मात् यस्य यत: या सूत्रात मांडलेली आहे. (ब्रह्मसूत्र)

**समन्वयवादी शिकवण :**

उपनिषदात अनेक प्रकारचे चिंतन प्रगट झाले आहे. द्वैत, विशिष्टाद्वैत, अद्वैत सगुण, ब्रह्म, निर्गुण ब्रह्म, तत्त्वज्ञान भक्ती, योग इत्यादि विषय आल्याने कधी कधी या विचारात एक प्रकारचा विरोध निर्माण होतो की काय असे वाटते. उपनिषदे म्हणजे अनेक विचारांचे कडबोळे आहे काय? असेही वाटते. मग उपनिषदात एकमेव असा प्रधान विचार कोणता मांडला आहे हे पाहावे लागेल. 'एकं एव अद्वितीयं ब्रह्म' हाच एकमेव विचार साऱ्या उपनिषद वाङ्मयातून प्रधान वा प्रमुखपणे मांडलेला आहे. ब्रह्म म्हणजे सत्य, नित्य, शुद्ध, बुध आणि मुक्त स्वभाव होय हे सारे विविध विचार वेगवेगळ्या पद्धतीने या प्रमुख विचाराचाच परिपोष करीत असतात. हा समन्वयतेचा धागा न सापडल्याने काही मंडळी, त्यात पाश्चात्य विचारवंतही आहेत, त्याना उपनिषदात एकच प्रमुख विचार असलेला आढळत नाही, असे म्हणतात. ब्रह्मसूत्राच याबद्दल एक सूत्रच आढळते. 'तत् तु समन्वयात्' या साऱ्या विविध विचारामागे एकसूत्रता एक वाक्यात कशी आहे हे समजावून दिलेले आहे. एकाच गोष्टीवर भर देण्याने हे जमत नाही. सर्वांशाने विचार करणे आवश्यक 'तत् ब्रह्म सर्वज्ञं सर्वशक्ति जगत् उत्पत्ति स्थितिलयकारणं वेदान्त शास्त्रात् एव अवगम्यते। कथम्? समन्वययात् । सर्वेषु हि वेदान्तेषु वाक्यानि तात्पर्येण एतस्य अर्थस्य प्रतिपादकलेन समनुगतानि। (शांकरभाण्य)

उपनिषदातील प्रतिपाद्य वस्तू ब्रह्म आहे आणि ते केवळ मानव तर्काने उलगडणारे नसल्याने त्याचे शब्दांत समर्थन करता येत नाही. मानवी भाषा आणि तर्क ही दोन्ही इंद्रियामार्फत मिळणाऱ्या मर्यादित ज्ञानावर आधारित असल्याने आणि ब्रह्म हे या साऱ्यांच्या पलीकडे असल्याने ते शब्द आणि बुद्धीच्या पलीकडे आहे हे सारे भेद केवळ विविध स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या पात्रतेप्रमाणे शिकविणे सोपे जावे या साठी केलेली युक्ती आहे. त्यामुळे मूळ ब्रह्मज्ञानाला यत्किंचितही बाधा येत नाही. ब्रह्मच उपनिषदातील अंतिम ज्ञानाचा विषय आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्य म्हणतात – उपनिषदातील महत्त्वाची शिकवण म्हणजेच ब्रह्म हेच सत्य आहे ह समजावून सांगणे. बाह्य विश्व वा अनात्म वस्तू अगर विविध रूपे ही सारी ब्रह्मरूपाचीच आहेत. मात्र त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. सत्य ही गोष्ट मन वा बुद्धीने आकलन करता येत नाही असे वेदान्त ठासून सांगतो.

(क्रमश:)

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

दि
शा
नियमित
वाचा.
आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*भिन्न ज्ञान पद्धतीतील उद्दिष्टे, क्षमता, साधने यांच्या अनुषंगाने विचार करणारा लेखमालेतील हा पुढील लेख – संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या जानेवारी २०१० अंकात आपण पद्मश्री कुमार केतकर यांनी '**शोध सत्याचा – तर्कशास्त्राने का आत्मानुभूतीने**' ह्या विषयावर नगरवाचन मंदिरात दिलेल्या व्याख्यानाचा उल्लेख केला होता.

**कुमार केतकरांनी** आधुनिक विज्ञानातं कुठचे प्रश्न हाताळले जात आहेत, कोणते प्रयोग चालू आहेत याची माहिती दिली. अर्थातच ह्या प्रयोगांची भूमिका ही वैश्विक 'सत्य' हे भौतिकवादी मार्गाने व आधुनिक विज्ञान शास्त्राच्या मार्गाने शोधले जात आहे, ही होती.



हे तर सर्वमान्य गृहीत आहे, हे माहीत असल्याने त्या विशिष्ट मार्गाची तुलनात्मक चिकीत्सा मांडली नाही, हे स्वाभाविकच होते. शिवाय कुमार केतकर हे माझे परम मित्र आहेत व त्यांनी हा प्राथमिक पूर्वरंग मांडावा हेच ठरले होते!!!

**शोध सत्याचा :**

पण, तरीही ह्या कार्यक्रमात, ह्या चर्चेचा उद्देश, हा त्या विषयाच्या 'शब्दांकनातून' स्पष्टच केला होता. 'शोध सत्याचा' हा विषय होता. कुठल्या मार्गाने, हा सवाल होता.

या विषयाच्या प्रत्येक शब्दाला अनेक अर्थ व श्लेष आहेत. 'सत्य' म्हणजे भौतिक जगात न्यायालयात पार्लमेंटमध्ये, अनेक राष्ट्राच्या संदर्भात सांस्कृतिक, आर्थिक वा राजकीय न्यायाने जाणले जाणारे नव्हे. कारण, ह्या सामाजिक, राजकीय 'सत्याची' जी केविलवाणी, दयनीय अवस्था आहे व ती कशी नाईलाजाने मानावी लागते, ह्याचे प्रत्यक्ष अनुभवी ज्ञान आपल्यापैकी प्रत्येकाला आहेच!!

**विज्ञानवादी तर्कशास्त्र :**

पण, कुमार केतकरांनी ह्या 'सत्यकल्पनेची' माहिती अनेक अर्थाने असूनही त्यांनीही मानवी जीवन व ह्या विश्वामधील, ज्या 'सत्याचा शाध' युगानुयुगे चालू आहे त्याचाच पाठपुरावा ह्या चर्चेत घेतला. पण अर्थातच, त्यांनी सांगितल्याप्रमाणेच, मानवी समाज ह्या पृथ्वीवर जन्माला येऊन संघटितपणे ह्या 'सत्याच्या' संकल्पनेचा जाणीवपूर्वक शोध घेऊ लागला तेव्हापासूनचाच इतिहास तपासला ही कालमर्यादा सांगितली. हा कालावधी फक्त काही १०,००० वर्षाहून जास्त नाही. मात्र, ह्या तपासातील 'भौतिक विज्ञानाची' बाजूच त्यांनी प्रामुख्याने मांडली.

प्रत्येकाचे जीवन परावलंबी असते.

**दोन मार्ग :**

त्याचे कारण अर्थातच 'सत्यशोधनात' जे दोन मुख्य भेद आहेत त्यांत भौतिक विज्ञानवादी' इतर ज्ञानपद्धतीला जरी आजमितीला विरोध करीत नसले, तरी ग्राह्यही मानत नाहीत, हे सर्वांना माहीत आहेच. त्यामुळे 'आत्मानुभूती' किंवा 'साक्षात्कारी' ज्ञान हे कदाचित 'सत्यज्ञानी' असू शकेल, पण ते व्यक्तिगत तऱ्हेचे व 'विज्ञानाला मान्य असणाऱ्या 'प्रमाणात' पास होणारे अजून तरी नाही, म्हणून त्याचा मागोवा घेतला नाही. तरीही, दिशाच्या डिसेंबर २००९ च्या अंकात मी वैदिक ज्ञानपद्धतीत त्याचा शोध कसा घेतला जातो हे सांगितले, व त्याचा 'ओझरता उल्लेख' केला. सरस्वती व कुंडलिनी जागृती ह्या क्रिया आवश्यक का आहेत हेही सांगितले!!! 'सरस्वती' ह्या विषयावर 'दिशा २००९' चा लेख कुमार केतकरांनी औपचारिकतेने पुन: उद्घाटन करून हात उंचावून साजरा केला!!!



ह्या आजच्या लेखात आपण ह्या भिन्न ज्ञानपद्धतीतील उद्दिष्टे, क्षमता, साधने व प्रमाणे व ज्ञानाचा 'अजेंडा', ह्याचा जास्त पुढचा व खोल विचार करणार आहोत.

खुद्द भौतिक विज्ञानपद्धतीत सुद्धा भौतिकतेच्या मर्यादेत होणाऱ्या संशोधन शास्त्रातही अनेक क्रांतिकारी बदल होत आहेत. त्याच्या दिशा फारशा स्पष्ट नाहीत तरीही प्रयत्न स्तुत्य आहते व चालू आहेत.

**History of Science :**

त्या शास्त्राच्या किंवा ज्ञानपद्धतीच्या प्रकारात ज्याला 'Scientific Revolution' असे म्हणता येईल असे टप्पे आले.एक उदाहरण न्यूटनविरूद्ध आईनस्टाईन ह्यांच्या परस्पर भिन्न तर्कपद्धतीचे देता येईल.

आता हे दोन्ही शास्त्रज्ञ एकाच तत्वज्ञानाच्या बैठकीचे व एकाच सांस्कृतिक स्वरूपाचे व मर्यादांचे असूनही – सत्यज्ञानाच्या निष्कर्षाबद्दल त्यांचे महत्त्वाचे भेद व बौद्धिक सत्य व नियम याच्या स्वरूपात सुद्दा गंभीर भेद आहेत. आता ही विचारपद्धती, शास्त्रपद्धती जरी दोन वैज्ञानिकांच्या तत्वाने ओळखली जात असली तरी तिचा पिंड एकच आहे, म्हणजे ती मुळातच 'मानवी तर्कपद्धती' एका भौतिकवादी जातीची, युरोपियन संस्कृतीची व विज्ञानाच्या म्हणजे भौतिक विज्ञानाच्या ज्ञातीची आहे.

**Paradigm Shift :**

पण, तरीही ही एक क्रांतिकारी बदलाची ज्ञानचौकटीतील बदल ह्याची निदर्शक आहे असे मानले जाते. शिवाय ह्या पद्धतीत बदल हा 'Paradigm Shift' ह्या वर्णनाने जाणला जातो.

'Thomas Kuhn' ह्याच्या 'Strucfure of Knowledge ' ह्या प्रसिद्ध पुस्तकात हा विषय व फरक वैज्ञानिक तत्त्वज्ञान म्हणजे 'Philosophy of Science' ह्या पातळीवर जाणला जातो. मग 'Paradigm' म्हणजे काय? साध्या भाषेत जर सांगावयाचे झाले तर 'विचाराची एक बंदिस्त चौकट' होय. त्या चौकटीच्या बाहेरी ज्ञानपद्धतीला चूक म्हणणारी व आपल्याला म्हणजे आपल्या पॅरॅडिम संप्रदायला जाणवलेल्या




**Thomas Kuhn**

सत्याची (Relative Truth) प्राणांतिक बूझ राखणाी व त्या चौकटीचा आग्रह धरणारी आसते.  ह्यालाच अंतिम सत्य  मानणे व दूसऱ्या Paradigm ला चूक म्हणणारी पद्धती असते.

मग इथे मोठा प्रश्न उभा रहातो तो म्हणजे ह्या दोन सांप्रदायिक विज्ञान मार्गातील निष्कर्षाचा सत्य निवाडा कोण व कोणत्या निकर्षावर व प्रमाणांवर करणार? ह्या संप्रदायाचे नंतर तट पडता तर ते जवळ जवळ राजकीय पद्धतीने आपली 'सत्ता' - सामाजिक व शास्त्री सत्ता) गाजवू लागतात. संबंधित संस्था ताब्यात ठेवतात, 'साधनसंपत्ती' जी शोधाकरिता लागते, त्यांची मालकी हक्काने बजावणी करतात. वगैरे वगैरे!! अशा 'पॅरॅडिम' पद्धतीत राजकीय सामाजिक प्रक्रियेमध्ये काय होते?' ह्याचे वर्णन खालील वाक्यात होऊ शकेल. राजकीय व शास्त्रीय मतभेद फरक नाही हे लक्षात असू द्या!!!

'And, once that polarisation has occurred, Political recource fails. Because they differ about the institutional matrix within political change is to be achieved and evaluated, because **they acknowledge - no Supra-Institutional framework for the adjudication of revolutionary difference, the parties to a revolutionary confict must finally resort to the techniques of mass persuassion offen including force.**'

To discover why **this issue of paradigm choice** can neve be unequivocally settled by logic and experiment alone, we must (shortly) examine the nature of the differences that separate the proponents of a traditional paradigm from their revolutionary successors.'




एकदा ह्या दोन मतप्रवाहांचे किंवा ज्ञानमार्गाचे ध्रुवीकरण झाले की कुठल्याही लवादाला निर्णय देता येणे अशक्य होते. कारण, तुलना करण्यासाठी किंवा सत्य शोधण्यासाठी स्वतंत्र 'प्रमाणे' किंवा 'निकष' उपलब्ध नसतात.

**नवीन भारतीय दर्शन (७ वे) :**

कदाचित ह्याच कारणाकरिता वैदिक ज्ञानप्रवाहात मानवी दर्शनात सहा दर्शने जवळजवळ सारख्याच दिमाखाने अजुनही जिवंत स्वरूपात आढळतात.

ती सहा दर्शने - चार्वाक, सांख्य, न्याय, वैशषिक, बुद्ध व अद्वैत' ही होत. भारतीय संस्कृतीत ती नष्ट केली नाहीत व जपली आहेत!! त्यामुळेच ह्या मनांच्या गलबत्यात स्वामी दयानंद यांनी एक क्रांतिकारी प्रसिद्ध घोषणा दिली -

'**Go back to Vedas**'

'**वेदांकडे परत फिरा**'

ह्याचा अर्थ कालचक्र उलट फिरवा, असा नव्हे तर वेदांच्या 'अपौरूषेय विधानांकडे, संकल्पनांकडे बीज रूपाने पहा!! सत्यदर्शनाच्या लाभार्थ!!

**'अपौरूषेय' :**

ह्या 'अपौरूषेय' शब्दाबद्दल बरेच गैरसमज आहेत. सर्वसाधारणपणे वेदांना निर्मीतीसाठी कोणी 'Prophet' म्हणजे 'मानवी देवदूत किंवा प्रेषित नाही – जसा इस्लामाला महंमद पैगंबर किंवा ख्रिश्चन धर्माला जीझस ख्राईस्ट आहे, ह्या अर्थाने!!

किंवा, वेद हे 'ईश्वर' निश्वसित आहेत, म्हणजे तर 'ईश्वर' ह्या संज्ञेबद्दल नेहमीच्याच शंका घेऊन वादांना उकळी फोडणे व प्रतिवादांना 'गोंधळाला' बोलावणे ठरेल!!

**Mr. Raimunda Panikkar :**

**Mr. Raimunda Panikkar (Professor of Rahgious Studies at the university of California Santa Barbara)** म्हणतात –

'Any one of us is the author of the Vedas, when we read, pray,and understand them, No body is the author of living words except the one who utters them.

The vedas are living words and the word is not an instrument of man, but his supreme form of expression.

What has no author, according to the 'apaurusheya' insight, is the relation between the word and its meaning or object.

The relationship is not an artificial or extrinsic relation caused by Somebody. There is no author to posit the type of relationship, which exists between the word and its meaning. To do this we would require another relationship and so on ad-infinitum. When a word ceases to be living word, when it ceases to convey meaning, when it is not a word for me, it is not Veda, it does not convey real or 'saving knowledge'.

The Vedas without an author cease to be an authoratative book only when you become their 'author', when through assimilation you are able to utter them, when you yourself are the proper origin, the 'auctor' of the text do the Vedas disclose their authentic authority." (P.13, 'The Vedic Experience' ISBN; 81-208-1280-2)

वेदांचे अपौरूषेयत्व जाणण्याचा हा प्रयत्न आहे. वेद म्हणजेच ज्ञान हे संहितेमध्ये सापडलेले किंवा केवळ एखाद्या मानवाला किंवा दैवी आत्म्याला उमगलेले, जाणवलेले ज्ञान नव्हे, किंवा एखाद्या पडदा वर उचलल्याने दिलेले ज्ञान नव्हे. वेद हे सत्य ज्ञान आहे. खऱ्या अर्थाने True Reality सांगणारे!!

आपल्याला ह्या नाशिवंत प्रकृतीमधून आपल्या सारख्या मर्त्य मानवाला पडदा (Veil) दूर केल्यावर सहजी दिसणारे ज्ञान नव्हे तर ह्या पडद्यावरच्या ज्ञानाच्या खोलात शिरून गवसणारे आहे.

मायेचा भ्रम देणारा हा पडदा बाजूला करून होणारे ज्ञान अशी प्रक्रिया नव्हे, तर ह्या पडद्याचे जे स्वरूप आपल्याला इंद्रियामार्फत दिसते त्याचे खरे स्वरूप त्याच पृष्ठभागावरच्या प्राथमिक ज्ञानाच्या पाठीमागे किंवा खोलवर होणारे 'बीजात्मक ज्ञान' म्हणजे वेद ज्ञान होय. अर्थात, हा माझा डॉ. पनिक्कर ह्याच्या इंग्रजी उताऱ्याचा स्वैर अनुवाद आहे.

पण, माझ्या मते ही सुद्धा एक मानवी तर्कशास्त्राची वेगळी पुरवणी म्हणता येईल. ह्या अगोदर मीमांसाकारांनी सुद्धा अशीच तर्कक्लिष्ट पद्धती वेदांचे अपौरूषयेत्व सांगण्याकरिता वापरलेली आहे.

**डॉ. कुसूमलता आर्य, 'पुरुषसुक्त अध्ययन' :**

परंतु, ह्या तर्कपद्धतीपेक्षाही 'स्पिरच्यिूअल सायन्सला' मान्य होणारे उत्तर आहे. **<u>आर्य डॉ. कुसूमलता, एम. ए. पी. एच. डी. यांच्या 'पुरुषसूक्त का विवेचनात्मक अध्ययन'</u> (३७६ पानी ग्रंथ)** (हा राजस्थान विश्वविद्यालय - स्वीकृत शोध प्रबंध - उच्चस्तरीय अध्ययन - अनुसन्धान-संस्थान (जयपूरी) - निदेशक प्रो. प्रवीणचंद्र जैन).

हे सविस्तर वर्णन देण्याचे कारण की ऋग्वेदांतील श्रृतीज्ञानी नारायण ऋषी यांचे पुरुषसुक्त हे अत्यंत महत्त्वाचे सूक्त असूनही, त्याची बाजारात मिळणारी पुस्तके ही अत्यंत वरवरची तोकडी व उघडउघड चूकीचा अर्थ लावणारी पुस्तके आहेत, हे माझ्या लक्षात आले. सृष्टि रचनेची क्रमयुक्त घटना इथे विदीत केली आहे.

**सर्वहुत यज्ञ सृष्टि यज्ञ व दशांगुले पुरुष :**

पुरुषसुक्तात 'सर्वहुत यज्ञ-पुरुषा'चे वर्णन आहे.

'तस्माद् यज्ञात सर्वहुत ऋच: सामानि जज्ञिरे।

छन्दांसि जज्ञिरे तस्माद् यजुस्तस्मादजायत।।

(ऋ १०.९०.९)

याचा अर्थ -

१) सर्वहुत यज्ञाने ऋग्, साम, छन्द: आणि यज: ची उत्पत्ति झाली.

२) (याज्ञिक परिभाषा मध्ये सर्वहुत) यज्ञाच्या सार्थकतेला हवि आणि यज्ञोपकरणांची आवश्यकता.

३) 'ऋक' 'साम' वगैरे काय आहेत?

४) छन्द पद चे वाच्य कोणते?

या सर्वांचे 'यज्ञ' ह्या वैदिक वैश्विक संकल्पनेतील उत्तर जाणून घेऊ या.

ह्या यज्ञाचा यजमान - सर्वहुत यज्ञमय प्रभू हा यज्ञ-सृष्टि निर्मीतीच्या मूळ यज्ञ होय. तो प्रयत्न अव्यक्त जगात झालां. ह्या यज्ञाची 'संकल्पना' इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती मधली होय.

सर्वसाधारण आपण पहाणारा 'यज्ञ' हा प्रतिकात्मक आहे. त्यातील कृती प्रत्यक्ष वैश्विक सृष्टीयज्ञान अशा होतात. यामध्ये <u>हवि</u> <u>'इदं सर्वम्'</u>

**<u>वेदि - अंतरिक्ष आहेत. साध्य, वसु और ऋत्विक - विश्वेदेवा आहेत व ते जेव्हा पृषदाज्यता हवि बनवतात तेव्हा 'भूमि' ही वेदि होते. ही वेदि - भूमि) निरंतर हविला ग्रहण करते व सहस्त्रगुणित करून परत देते.</u>**

**<u>हे सर्व वर्णन याज्ञिकांच्या (Jargon) 'परिभाषेतील' आहे.</u>**

पण त्याचा सोपा सरळ अर्थ असा आहे की 'पुरूष' ही एक अव्यक्तातील नवीन संकल्पना (Embodied consciousness) करून त्यात पृथ्वीवर (भूमिवर) 'दशांगुले पुरूष' (दहा अंगूली असणार पुरूष (मानवी फॉर्म) ही संकल्पना करण्यात व योजण्यात आली.

कोणी केली? मूळ आदि शक्तीनेच. ही शक्ती भौतिक क्षेत्रातील मानवी तर्कामध्ये बसणारी नव्हे. ह्या वैश्विक शक्तिला तीन अंगे आहेत. इच्छा, ज्ञान व क्रिया ही होत. पृथ्वीवर वा भूमिवर प्रतिष्ठित होणारा संकल्पित दशांगुले पुरुष म्हणजे आपल्याला परिचित असलेला 'मानव' ह्याला विश्वाचे, ब्रह्माचे ज्ञान होण्याची शक्ति दान केली आहे. हा विशेष अधिकार होय. इतर प्राण्यांना तो नाही.

ह्या पुरूषाला जे हृदयआहे त्यालाच ज्ञानवेदिची भूमिका बजावयाची आहे. त्याच्या हृदयाचे जे स्पंदन होते, त्यांना ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या पद्धतीचे ज्ञान 'छंद ज्ञानाने' क्रमाक्रमाने उद्भवत जाते आहे.

**हा 'वैश्विक' यज्ञ अव्याहत चालू आहे. तो 'Static' नसून 'Dynamic' चालणारा - अनंत काळापर्यंत चालणारा आहे. ज्ञानाचे हे स्फूरण आहे तेच 'वेदज्ञान' प्रगट होत आहे.**

आणि हे '**अपौरूषेय**' आहे. हे या वर्णनावरून उघड आहे. शिवाय ह्या विश्लेषणाचा आधार ऋग्वेदात नमूद केला आहे. तो पुरावा ग्राह्य मानायला हरकत नसावी!!

ह्या ज्ञानाची वैशिष्टपूर्ण विभागणी अशी होते.

**१) ऋग्वेदाचा प्रमुख छंद गायत्री आहे.**

**२) यजुर्वेदाचा - त्रिष्टुप छंद**

**३) सामवेदाचा जगती छंद**

**४) अथर्ववेदाबद्दल - अथर्वणां चन्द्रमा वेदता।**

**तदेव ज्योतिः।**

**सर्वाणि छन्दासि।**

**आपः स्थानम् ।।**

**(ऋचां गायनं छन्द यजुषां त्रैपुटभं छन्दः**

**साम्नां जागतं छन्दः। गो. ब्रा. १.२९**

वेगवेगळे छंद हे शक्तीचे वैशिष्ट्य आहे. त्या शक्तीला विशेष प्रकार वा भेदाला अनुरूप असे हे छंद विश्वामध्ये प्रसारतात व त्याच्या लक्षांवर भौतिक क्षेत्रात हेच Vibrations व Frequency कार्य करतात. ह्या संज्ञेने ओळखले जातात!

ऋग्वेदात एक वचन आहे की :

**<u>'यत्र ब्रह्मा पवमान छन्दस्यां वाचं वदन्</u>।।''**

**याचा अर्थ 'ब्रह्मा' सृष्टि निर्माता(शक्ति) छंदोगत भाषा बोलते.**

आता प्रश्न हा पडेल की हा '**मूळ यज्ञ' कसा झाला, कोणी केला?** १६ व्या पुरुषसूक्ताच्या ऋचेत '**यज्ञेन यज्ञमयजन्त...**' ह्या वर्णनात ह्या मूळ बीजरूपी संकल्पनेचा जन्म विदीत केला आहे. याचे स्वरूप कसे? त्याचे उत्तर असे आहे की



**भौतिक प्रतिकात्मक यज्ञ**

'**ऋग्वेद** वेद के ज्ञाता को **होता**

**यजुर्वेद** ज्ञाता को **अध्वर्यु**

**सामवेद** के ज्ञाता को **उदगाता**

**अथर्ववेद** के ज्ञाता को **ब्रह्मा** माना जाता है ।

**(हे गौपथ व वायु पुराणात सांगितले आहे)**


इथे कोणीही रास्तपणे काही एका किंवा प्रश्न उपस्थित करू शकतील. पण, गूढ ज्ञानाच्या उलगडण्यात काही स्थळे अत्यंत सहानुभूतीनेच हाताळावी लागतात. हे अपरिहार्य आहे!!

**मानवी बुद्धीचे तर्कशास्त्र :**

सध्याच्या 'मानवी फॉर्म' मध्ये बुद्धीची तर्कपद्धती आहे. ती काही पूर्ण शुद्ध, पूर्ण विकार रहित, पूर्णपणे सत्यान्वेषी आहे असे सर्टिफिकेट कोणीही देणार नाही.

तेव्हा केवळ भौतिकवादी ज्ञानपद्धतीचा मार्ग चोखाळणाऱ्या माणसाची तर्कपद्धती नकळतपणे त्या संप्रदायाला अभिनिवेशाने व काही पूर्वग्रहांनी, दोषांनी बांधली जाते. त्यांना जरी असे वाटत असले कीं ती पद्धती निर्दोष आहे व आपण तटस्थ आहेत. तरी तसे ते कधीच नसते वा कधीच नव्हते!! त्याच्या ऐतिहासिक पुरावा आधुनिक विज्ञानाच्या 'Science-History' मध्ये आहे व त्याचे तत्त्वज्ञानाचे कैवारी 'Philosophers of Science' (विज्ञान महर्षी) सुद्धा 'Falliability of Scientific Theories' वैज्ञानिक सिन्दान्तांची दोषी अपरार्हयिता मान्य करतात. जुने 'थिअरम्' चुकतात व नवीन जन्माला येतात - काही काळाने तेही चुकलेले लक्षात येतात व नवीन थिअरीला मान्यता मिळते. हा असाच प्रवास चालू आहे. पण ती नवीन थियरी सुद्धा चुकीची  निघणार नाही किंवा ठरणार नाही, याची ग्वाही ते देत नाहीत. मग इतर ज्ञानपद्धतीत ही मुभा का नसावी?

त्यामुळे, ज्या वेद संहितेची जपणूक भारतातील समाजाने युगेन्युगे केली, त्यालाही कांहीतरी संयुक्तिक अव्यक्त व सुयोग्य जगातील कारणे असणे संभवनीय आहे आणि <u>**हा जो पुसटसा व अस्पष्ट 'ज्ञानधागा' ह्या 'नाशिवंत मानवाला' प्राप्त आहे त्याची बूझ ठेवून व आदर ठेवून, त्या ज्ञानाचा सहानुभूतीने, श्रद्धेने व ज्ञानमार्गाच्या वेगळया वाटचालीने करण्याचे स्वातंत्र्य संशोधकांना दिले पाहिजे**</u>. नाहीतर येणाऱ्या नवीन पिढीवर अन्याय होईल व अपौरूषेय ज्ञानाचा हा अमोल ठेवा, 'शोधीत वारसा', नष्ट होईल.




अशी संधी आर्य डॉ. कुसूमलता यांना मिळालीच पाहिजे, असे मला मनोमन वाटते. त्या आर्य समजीस्ट होत्या व स्वामी दयानंद व महयोगी अरविंद आणि कपालीशास्त्री ह्यांनी ज्या पद्धतीने वेदांचे अर्थ लावण्यात या युगात यश मिळवले, त्या गुणवंत मार्गाचा पाठपुरावा करणे, हे सत्यान्वेषी मानवजातीचे कर्तव्य ठरते !!

ह्या छोट्याशा लेखात जगभरात चाललेल्या अफाट व अखंड मानवी प्रयत्नात जे प्रयोग चालले आहेत त्यात केवळ दोन मोठे प्रयत्न आपण चर्चेला घेतले आहेत. एक आहे बहुश्रृत भौतिक विज्ञानवादी प्रयत्न.

दुसरा प्रयत्न अत्यंत बाल्यावस्थेत आहे. त्याचे नांव 'अपौरूषेय वेद ज्ञानाच्या' यज्ञ संकल्पनेतून 'दशांगुले पुरूष' म्हणजे 'मानवी फॉर्म' किंवा Embodied Consciousness ह्या वर्णनाने जाणला जाणारा मानव व मानवी समाज-प्रकृतीच्या सहकार्याने व जीवन आधारावर हा वैश्विक यज्ञ संकल्पनेतील भौतिक पातळीवर ह्या पृथ्वीवर चालणारा यज्ञ. हा ज्ञानयज्ञ आहे!! जीवनयज्ञ आहे. ह्या यज्ञात सर्वजण सामील आहेत. चैतन्य


असलेले व अचेतन असलेले सुद्धा सहभागी व लाभार्थी आहेत. ह्या यज्ञाच्या संकल्पनेचा पुसटसा आकार व अस्पष्ट स्वरूप आजमितीला ह्या भारतभूमीवर 'सांस्कृतिक वारसा'घेऊन आला आहे. समाजाला त्याचे पूर्ण भान व ज्ञानसुद्धा नाही. राज्यकर्त्यांना ह्याबद्दल पत्ताही नाही व सोयरसूतक नाही.

पण, याही वैश्विक योजनेने एका विलक्षण प्रकारे ह्या यज्ञाची सूप्त जाणीव व या यज्ञाच्या अनंततत्वाची अगदी पुसट ओळख ह्या भारतभूमीवर काही साक्षात्कारी विभूतींनी जतन करण्याचे प्रयत्न नजीकच्या इतिहासात केले आहेत.

**<u>स्वामी दयानंद, महर्षी अरविंद व कपालीशास्त्री</u>** यांनी ह्या अंध:कारमय गर्तेत सापडलेल्या वेदज्ञानाचा खरा अर्थलावण्याचा फार मोठ्या महत्त्वाचा प्रयत्न केला आहे. त्याच्या अगोदर कळत, नकळत, वादांच्या भोवऱ्यात, गैरअर्थाच्या गुंतवळ्यातून संहिता, वेदपुरूष, उपनिषदे, भगवद्गीता, अष्टाव्रत गीता, पातंजल योगमार्ग, नाथपंथी कुंडलिनी मार्ग,तंत्र, भक्तिपंथ, श्रीयंत्र, पुराणे, ब्राह्मणे, अरण्यके वगैरे वगैरे प्रकाराने अत्यंत विस्कळीत पद्धतीत हा ज्ञानाच पसारा ह्या पिढीपर्यंत आला आहे.



**स्वामी दयानंद**



**महायोगी अरविंद**



**कपालीशास्त्री**


**स्पिरीच्युअल नूतन दर्शन मार्ग :**

**हा एक तेजस्वी, प्रभावी एकूलता एक वेगळा मार्ग मानवाच्या हातात आला आहे व बऱ्याच अंशी तो जिवंत स्थितीत भारतात हिंदू समाजाने जपला आहे. ही खरी गोष्ट आहे. तेव्हा हिंदूकडे <u>(Endangered species) नाशभयग्रस्त प्राणी धर्माच्या चष्म्यातून न पहातां ह्या वेदिक ज्ञानमार्गाचे पाईक म्हणनू पाहिले जावे,</u>** असे मनोमन वाटते. तरच हा विस्कळीत ज्ञानमार्ग पुढे जाईल व भविष्यात 'सत्यज्ञानाची मानवाला प्राप्ति हाईल असे वाटते.

ह्या तुलनेने भौतिक वैज्ञानिक ज्ञानमार्ग एका भौतिक तोकड्या चौकटीत वाटचाल करत आहे. पण, त्यातील धडपडींचाही मानवाला त्याच्या अनंतातील भविष्यातील वाटचालीत उपयोग होणार आहे. ह्या ज्ञानालाही Integral Knowledge and Integral Yoga ह्या नूतन ज्ञानशास्त्रात स्थान व कार्य आहे. ह्या ज्ञानप्रांतातही काही नवीन प्रकाश व Metaphysical ज्ञानाचा अंतर्भाव होणार आहे व त्याच्या Physics ह्या मूळ चौकटीतून मुक्ती मिळत आहे. त्याचा आढावा पुढील अंकात घेऊया!!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●




## प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे

**विश्वनाथ शेंड्ये – शोक सभा :**



प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे ग्रंथपाल व समर्थ सेवक मंडळ आणि इतर अनेक संस्थांशी संबंधित असणारे विश्वनाथ शेंड्ये यांचे २४ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथालयात दि. १० फेब्रुवारी रोजी शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेत शेंड्ये यांचे हितचिंतक, स्नेही, नातेवाईक तसेच अन्य मान्यवरांनी आपल्या आठवणींना उजाळा देत कै. शेंड्ये यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. श्री. मा. य. गोखले, श्री. यशवंत साने, श्री. शंकरराव मठ, श्री. रवींद्र रामदास, सौ. धनश्री लेले, प्रा. मोहन पाठक, श्री. संदीप कळंबे, सौ. अपर्णा ओक, श्री. अनिल हजारे आदींनी यावेळी शेंड्ये यांच्याबद्दलच्या आठवणी सांगून आदरांजली वाहिली.

सभेच्या अध्यक्षस्थानी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर होते. शेंड्ये यांच्या काम करण्याच्या पद्धतीतून त्यांनी अनेक माणसे जोडल्याचे सांगत त्यांनी शेंड्येची उणीव नेहमीच भासेल असे आपल्या अध्यक्षीय मनोगतात सांगितले. संस्थेचे कार्यवाह श्री. अुत्तम जोशी यांनी सभेचे सूत्रसंचालन केले.

# साहित्य-जगत

सव्यसाची लेखक श्री. वि.र. काळे (कल्पक सहवास, १५-ब/१, शनिवार पेठ, सातारा-४१५ ००२) यांनी लिहिलेले व अरविंद रघुनाथ तेंडुलकर (वसंत बुक स्टॉल, न. चिं. केळकर मार्ग, हनुमान मंदिराजवळ, दादर- प., मुंबई - ४०० ०२८) यांनी प्रसिद्ध केलेले आचार्य अत्रे : महाराष्ट्राचे बलदंड व्यक्तिमत्त्व (पृ. २४८, मूल्य रु. २५०/-) हे एक अप्रतिम पुस्तक आहे.

**अद्‌भुत व्यक्तिमत्त्व :**

आ. अत्रे या अद्‌भुत व्यक्तिमत्त्वाचे सारे पैलू झगझगीत आहेत. नाट्य, चित्रपट, वक्तृत्व, साहित्य, राजकारण, काव्य, पत्रकारिता इ. अनेक क्षेत्रात त्यांनी प्रचंड कामगिरी केलेली आहे. विनोद हा तर अत्रे ह्यांचा लेखणीचा आणि वाणीचा प्राण होता. विनोदाविषयी श्री. काळे यांनी आ. अत्रे यांची अनेक अवतरणे या पुस्तकांत उद्‌धृत केली आहेत. विनोदाविषयी खुद्द आचार्य अत्रेच म्हणतात,''सगळ्यात विनोद मोठा कठीण, बाकीची गोष्ट जमेल पण विनोद जमणार नाही. कोण कुठं हसतं,का हसतं कशानं हसतं हे बारकाईनं पाहिलं पाहिजे मग तुम्हाला विनोद कुठल्या गल्लीत राहतो हे आपोआपच कळेल. जगात जे महापुरुष झाले ते सगळे विनोदी होते. तेव्हां त्यांच एखादं तरी विनोदी वाक्य आहे का याची चौकशी करा. ते सापडलं नाही तर खुशाल सांगा की हा काही मोठा मनुष्य नाही. काय आहे नि काय नसावं यातल्या फरकावर विनोद असतो.''

**वाचनीय चरित्र :**

या चरित्र लेखनासाठी श्री. वि. र. काळे यांनी महान व्यासंग केला. सखोल अभ्यास, सखोल विचार आणि सर्वांगीण अवलोकन ह्या गुणांमुळे त्यांनी लिहिलेले हे चरित्र अत्यंत वाचनीय झाले आहे. आ. अत्रे यांची ज्येष्ठ कन्या श्रीमती शिरीष पै यांची प्रस्तावना या ग्रंथास लाभली आहे हेही या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य आहे. त्या म्हणतात, ''माझ्या जन्मापासून तो त्यांच्या मृत्युपर्यंत त्यांचा सर्व जीवनपट, त्यांचे सारे कर्तृत्व आणि त्यांचे सारे पराक्रम मी माझ्या डोळ्यांनी पाहिले. त्यामुळे श्री. वि. र. काळे ह्यांनी लिहिलेले हे चरित्र माझ्या नजरे समोर एखाद्या महान चित्रपटासारखे जिवंत उभे राहिले. त्यामुळे झालेला परमानंद अजून माझ्या हृदयात दरवळतो आहे. हे त्यांनी लिहिलेले चरित्र अत्यंत वाचनीय झाले आहेच, पण वाचकाच्या काळजाचे ठाव घेणारे असे हृद्य, हृदयस्पर्शी आणि हृदयंगमही झाले आहे.''

१३-८-१८९८ रोजी जन्मलेल्या व १३-६-१९६९ रोजी मृत्यू पावलेल्या त्या प्रचंड व्यक्तिमत्त्वाचे सारे जीवन अपूर्व असे होते. प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपला स्वतंत्र असा ठसा उमटविला. महाराष्ट्रच्या इतिहासात त्यांचे अफाट कार्य सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. आ. अत्रे त्यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनाच्या वेळी म्हणाले होते,'उद्या माझी समाधी बांधायची झाली तर तिच्यावर एकच वाक्य लिहा - हा मनुष्य मूर्ख असेलं पण कृतघ्न नव्हता. आ. अत्रे यांच्याच शद्बात म्हणायचे झाले तर असे व्यक्तिमत्व दहा हजार वर्षात निर्माण झालेले नाही.'

प्रत्येकाने वाचलेच पाहिजे असे हे अप्रतिम चरित्र श्री. काळे यांनी लिहिले आहे त्याबद्दल त्यांचे व प्रकाशक तेंडुलकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**श्री. वि. र. काळे यांचे इतर प्रकाशित ग्रंथ :**

श्री. तेंडुलकर यांनी त्यांच्या वसंत बुकस्टॉल या प्रकाशन संस्थेने आजवर लहानमोठी अशी पाचशेच्यावर पुस्तके प्रकाशित केली त्यातील काही वाचनीय ग्रंथ असे–

'असा घडला हिटलर' (दु.आ), 'हिटलर आणि त्याची प्रभावळ', 'विन्स्टन चर्चिल – युद्ध पिपास की युद्धनेता? (दु.आ.), 'इंदिरा प्रियर्शिनी', वा. य. गाडगीळ – एक समर्पित जीवन, 'मी इंदिरा', 'ज्ञानयोगी बाबासाहेब आंबेडकर', 'पु. भा. भावे विचार दर्शन', 'पंडितजी', 'सरदार वल्लभभाई पटेल– भारताचा पोलादी पुरुष' (दु.आ.), 'गडकऱ्यांचे खालनायक', ग.दि. माडगूळकर', डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन', 'धम्मचक्र प्रवर्तक' – ज्ञानयोगी डॉ आंबेडकर. आगामी – मराठी विनोदाचे पंचप्राण, 'पटावरील प्यादी आणि मोहरे', 'बांगड्या भराबांगड्या', पं. नेहरू पण दुसरी बाजू, विस्मृतीतील विचारवंत

**निवडक नवयुग (१९४०–६०)–अत्रे गौरवांजली :**

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात व दिवाळी अंकांच्या शताद्बी वर्षाची सांगता या निमित्ताने ऐन दिवाळीत प्रसिद्ध झालेला संग्राह्य ग्रंथ म्हणजे अंकाच्या स्वरूपात झालेला. 'निवडक नवयुग' हा अद्वितीय ग्रंथ होय. ५१२ पृष्ठांच्या (मूल्य ७५०/–) या महाकाय ग्रंथात संयुक्त महाराष्ट्र चळवळ, साहित्य आणि संस्कृती यात धगधगते योगदान देणाऱ्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व आ. अत्रे यांच्या विषयीचे पु.ल. देशपांडे, प्रभाकर पाध्ये, वसंत बापट, सुधा अत्रे इ. मान्यवराचे उत्कृष्ट लेख, 'अत्रे उवाच (यात अत्र्यांचे 'कला–साहित्य', व्यक्तित्वविषयक, द्विभाषा–संयुक्त महाराष्ट्र) त्यांचे लेख व भाषणे, स्वतःविषयी इ. भरगच्च मजकूर संकलित केलेला आहे. या संग्राह्य ग्रंथाची संकल्पना, संकलन, संपादन व प्रकाशन श्री. अनिल कोठावळे (मॅजेस्टिक बुक हाऊस, विष्णू निवास, से. बापट मार्ग, टिळक पुतळ्याजवळ, दादर – प. मुंबई) यांचे आहे. मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळविणाऱ्या या अद्वितीय ग्रंथाचे प्रकाशन केल्याबद्दल 'दिशा' तर्फे त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. संत तुकारामांच्या 'आम्हां घरी धन शद्बांचीच रत्ने। शद्बांचीच शस्त्रे यत्न करूं।। शद्बची अमुच्या जीवाचे जीवन। शद्ब वाटू धन लोकां।। तुका म्हणे पहा शद्बचि हा देव। शब्दांचि गौरव पूजा करूं।। या शद्बांची यथार्थता ह्या ग्रंथाने सिद्ध केलेली आहे.

**आपले वाङ्मय वृत्त :**

''आपले वाङ्मय वृत्त''(संपादक सतीश काळसेकर) ह्या छोट्याशा पण दर्जेदार मासिकाने ऑगस्ट ०९ मध्ये दुसऱ्या वर्षात पदार्पण केले आहे. लोकवाङ्मय गृह (भूपेश गुप्ता भवन, दुसरा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५) या प्रकाशन संस्थेतर्फे त्यांची ही गृहपत्रिका प्रसिद्ध केली जाते.

सर्वश्री सतीश काळसेकर, वसंत आबाजी डहाके, नितीन रिढे, मुकुंद टाकसाळे, श्याम मनोहर, गणेश विसपुते, शशिकांत सांवत, निखिलेश चित्रे, सुनील कर्णिक आणि रुपाली शिंदे इ. अनेक मान्यवर लेखकांचे साहित्य या १६ पानी मासिकात प्रसिद्ध होत असते. त्यामुळे प्रत्येक अंक वाचनीय व संग्राह्य असतो. (पूर्वीचे २००१ ते २००७ पर्यंतचे ६ वर्षाचे अंकांतील पानांचा कागद साधा होता. आता २००८ पासूनच्या अंकाचा कागद उत्तम व रंगीत आकर्षक मुखपृष्ठ असते. रंगीत मुखपृष्ठ २००८ पासून सुरू झाले, म्हणून २००८ हे मासिकाचे पहिले वर्ष असे मानण्यात येत आहे!)

**'लोकवाङ्मय गृहा'ची दर्जेदार प्रकाशने :**

१९७३ साली या प्रकाशन संस्थेची स्थापना

झालेली असून आजवर संस्थेने ९०० हून अधिक उत्तमोत्तम अशी पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. त्यातील काहींची नावे द्यायची म्हटली तरी स्थलाभावी ते शक्य नाही. तरीपण गेल्या २/३ वर्षात प्रसिद्ध झालेल्या निवडक पुस्तकांची नावे अशी-

✯ इंग्रजी-हिंदी मराठी या तीन भाषांमध्ये उपलब्ध असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या जीवनाचे व काळाचे समग्र दर्शन घडविणारा सचित्र चरित्रात्मक ग्रंथ 'डॉ बाबासाहेब आंबेडकर' (पृ. २८८ त्यांत १३५ कृष्णधवल छायाचित्र व ५० दुर्मीळ दस्तऐवज आहे. मूल्य रु. २०००/-)

✯ मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले (कवितासंग्रह पृ. १०४, मूल्य - १००/-, ले. नामदेव ढसाळ)

✯ गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी - डॉ. विलास खोले (पृ. २६६ मूल्य रु. २००/-), माझ्या जीवनाची पटकथा (आत्मकथन - ले. बलराज साहनी. अनुवाद - अंबरीश मित्र) आवृत्ती दुसरी, नंतर आलेले लोक (पाचवी आवृत्ती कविता संग्रह) - अरूण काळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : कोणाचा कैवारी? कोणाचा वैरी? (पृ. १२८, मूल्य रु. १५०/-) ले ल. स. कारखानीस, आगरकर विचार (गोपाळ गणेश आगरकर यांच्या विचार विश्वाचा भा. ल. भोळे, अशोक चौसाळकर, तानाजी ठोंबरे यांनी घेतलेला वेध. प्रस्तावना-ग. प्र. प्रधान) पृ. २३०, मूल्य रु.२५०/, 'राजर्षी शाहू वसा आणि वारसा' (पृ. ५३, मूल्य रु. ५०/-) शाहू महाराजाच्या विचाराची प्रस्तुतता ठळक करणारे पुस्तक - ले. ॲड. गोविंद पानसरे, हाकिकत आणि जटायू (सातवी आवृत्ती पृ. १३२, मूल्य रु. १२०/-) ले. केशव मेश्राम, हिंद संस्कृती आणि स्त्री (आठवी आवृत्ती, पृ. १९२, मूल्य रु. १००/-) ले. डॉ. आ. ह. सांळुखे, भारतीय विवाह संस्थेचा इतिहास (दहावी आवृत्ती, पृ. १५२ मूल्य रु. ८०/-) ले. वि का राजवाडे, आज्ञापत्र (चौथी आवृत्ती पृ. १५२, मूल्ये रु. १५०/-) संपादन डॉ. विलास खोले, मार्क्सवाद म्हणजे काय? (दहावी आ. पृ. ८८, मूल्य १०/-) अनु. सरला कारखानीस, आई (पंधरावी आवृत्ती, पाने ४९२, मूल्य ८०/-) ले. मॅक्झिम गार्की

**'व्हाय मेन डोन्ट लिसन... :**

(ले. बार्बरा आणि ॲलन पीस - अनु. ॲड. शुभदा विद्वांस), स्त्री व पुरुष यांच्यातील नातेसंबंध बिघडतात ह्याचे कारण पुरुषांना हे समजत नाही की बायका त्यांच्यासारख्या का नाहीत, आणि बायकांना वाटते की आपण जसे करतो तसे पुरुष का करत नाहीत. ह्याचे कारण म्हणजे, स्त्री-पुरुष वेगळे आहेत. १पण दोघे वेगवेगळ्या जगात रमतात. त्यांची मूल्ये वेगवेगळी असतात, पण फारच थोडे पुरुष हे मान्य करतात.

एक सामाजिक गोष्ट अशी की स्त्री व पुरुष कुठल्याही धर्माचे, पंथाचे रंगाचे असले तरी त्यांचे दृष्टिकोन व विश्वास सारखेच असतात.

उपरोक्त मजकूर आहे 'व्हाय मेन डोन्ट लिसन...' या बार्बरा आणि ॲलन पीस या दांपत्याने लिहिलेल्या पुस्तकाच्या (पृ. १२२, मूल्य रु. १२०/-) मलपृष्ठ चारवरील, (१४०२, कॉसमॉस टॉवर, नवनीत मोटर्सजवळ, एल बी. एस. मार्ग, पाचपाखडी, ठाणे) यांनी या पुस्तकाचा अनुवाद केलेला आहे व तो सुनील अनिल मेहता (मेहता पब्लिशिंग हाऊस) यांनी मे २००९ मध्ये प्रकाशित केलेला आहे.

**ॲलन पीस आणि बार्बरा पीस या दांपत्याचे कर्तृत्वः**

अचाट कर्तृत्वाचे हे दांपत्य आहे प्रस्तुत पुस्तकात त्यांची लक्षवेधक माहिती दिलेला आहे ती अशीः-

'ॲलन आणि बार्बरा पीस यांनी लिहिलेल्या चौदा पुस्तकांपैकी आठ 'बेस्टसेलर' ठरली आहेत. त्यांचे साहित्य जगातील पन्नास भाषांमध्ये प्रसिद्ध झालेले आहे व जवळजवळ शंभर देशातील कोट्यवधी वाचकांपर्यंत ते पोहोचले आहे. त्यांच्या पुस्तकांच्या दोन कोटींहून अधिक प्रती आतापर्यंत विकल्या गेल्या आहेत या दोघांनी लिहिलेले 'व्हाय मेन डोन्ट हॅव अक्क्र ॲन्ड विमेन ऑल्वेज नीड मोअर शूज' 'हे पुस्तकही लोकप्रियतेच्या शिखरावर आहे.

ॲलन पीस हे जन्माने ऑस्टेलियन असून व्यवसायानिमित्त तीस देशांमध्ये त्यांचे सतत भ्रमण चालू असते. यशस्वी होण्याचा मंत्र ते गेली तीस वर्षे जगाला शिकवीत आहेत. बार्बरा पीस या अनेक 'बेस्टसेलर' पुस्तकांच्या लेखिका व सहलेखिका आहेत. त्या ऑस्ट्रेलियन तरुणांना 'बॉडी लँग्वेज' व संभाषण कौशल्ये शिकवितात. त्या अत्यंत यशस्वी मॉडेल व विक्री क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व आहेत.

'आपल्या पुस्तकातील माहिती अचूक व परिपूर्ण असावी या साठी हे दोघे भरपूर मेहनत घेतात. त्यासाठी ते देशोदेशीच्या एक्स्पर्टसना भेटतात, लोकांच्या मुलाखती घेतात, सेमिनार्स घडवून आणतात. म्हणूनच त्यांची पुस्तके वाचकांच्या पसंतीस उतरतात.'

**पुस्तकाचे अंतरंग :**

लेखकाचे व अनुवादकाचे मनोगत आणि 'समानतेतून भिन्नता', दृष्टी व दृष्टिकोन', 'सारं काही मनाच्या गाभाऱ्यात' इ. अकरा प्रकरणे या पुस्तकात दिलेली आहेत या प्रकरणांतून त्यांनी 'समान पेशीतून निर्माण झालेले स्त्री व पुरुष कसे भिन्न आहेत हे अतिशय साध्या, सोप्या व तुमच्या आमच्या परिचयाच्या उदाहरणांतून खुमासदार शैलीत तुमच्या नजरेस आणून दिलेले आहे.

'स्त्री व पुरुष ह्यांचे जगाकडे बघण्याचे दृष्टिकोन कसे वेगळे आहेत.' स्त्री व पुरुष ह्यांचा मेंदू आकाराने कसा लहान-मोठा आहे. 'बोलणे आणि ऐकणे ह्या मध्ये स्त्री-पुरुषांमध्ये कसा फरक आहे. दोघांच्या क्षमतांमधील फरक अनेक बाबतीत दोघांच्या विचारसरणीत असलेला फरक-त्यांची शास्त्रीय माहिती इ. गोष्टींबद्दल मंत्रमुग्ध करणारी माहिती दिली आहे. त्यांनी केलेले शास्त्रीय विवेचन विनोदी ढंगाने केले आहे त्यामुळे ते समजावून घेऊन, एकमेकांमधील दोषांवर टीका न करता त्यांच्यातील बलस्थाने शोधून काढून एक सुदृढ, सशक्त समाज निर्माण करणं हा त्यांचा हेतू आहे.

हे पुस्तक लिहिण्यासाठी मूळ लेखक दांपत्याला तीन वर्षांचा अवधी व चाळीस हजार किलोमीटरचा प्रवास करावा लागला. या पीस दांपत्याने एक उत्तम कलाकृती सादर केली आणि त्याचा आस्वाद व लाभ मराठी भाषिकांनाही व्हावा म्हणून ॲड. शुभदा विद्वांस यांनी त्याचा ओघवत्या शैलीत अनुवाद केला. स्त्री-पुरुषांनी आपसातले नातेसंबंध लक्षात घेता अंतर्मुख व्हावे व आपले भावी आयुष्य सुफल, अधिक प्रेममय जिव्हाळ्याचे करावे हाच संदेश या पुस्तकाने दिला आहे.

**१८५७ चे स्वातंत्र्यसमर :**

भारताच्या ज्वलंत व विलक्षण इतिहासापैकी १८५७ हे एक तेजस्वी पर्व आहे. १९०७ मध्ये स्वा. विनायक दामोदर सावरकर यांनी तो इतिहास जिवंत करणारा '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहिला. १८५७ ला दीडशे वर्षे होऊन गेली आणि त्या मूळ ग्रंथास १०० वर्षे होऊन गेली. हा ग्रंथ घराघरात जावा आणि भावी पिढ्यांसाठीही तो प्रेरक ठरावा यासाठी मे २००८ मध्ये ग्राहकहित प्रकाशन (टिळक रोड, पुणे ४११०३०) या संस्थेने तो ४०० पृष्ठांचा ग्रंथ केवळ ६०/- रुपयांत उपलब्ध करून दिला. ग्रंथ वैभवच्या

आशुतोष श्रीकृष्ण गोखले या साहित्यप्रेमी व सावरकर भक्ताने या ग्रंथराजाच्या दोन हजारांहून अधिक प्रतींची विक्री केली. त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. आता त्यांनी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या 'शिवचरित्राची प्रकाशनपूर्व नोंदणी सुरू केलेली आहे.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## अणुबॉंब कसा असतो?

हिरोशिमावर टाकण्यात आलेला अणुबॉंब हा युद्धात वापरण्यात आलेला पहिला अणुबॉंब, नागासाकीवर टाकण्यात आलेला अणुबॉंब हा संहारासाठी वापरला गेलेला दुसरा आणि आजपर्यंतचा तरी शेवटचा अणुबॉंब. हिरोशिमावर टाकण्यात आलेल्या अणुबॉंबमध्ये युरेनियम तर नागासाकीवर टाकण्यात आलेल्या बॉंबमध्ये प्लुटोनियम हे मुलद्रव्य वापरण्यात आले होते.

ज्या मूलद्रव्यांच्या अणूचे केंद्र फोडण्यात शास्त्रज्ञ यशस्वी झाले आहेत, त्यांतील युरेनियम आणि प्लुटोनियम ही दोन प्रमुख मूलद्रव्ये.

कुठलाही अणू हा प्रोटॉन, इलेक्ट्रॉन आणि न्यूट्रॉन अशा तीन घटकांचा बनलेला असतो. त्याच्या केंद्रात प्रोटॉन आणि न्यूट्रॉन घटक असतात व या भोवती इलेक्ट्रॉन्स फिरत असतात. जेव्हा एखाद्या अणूचे केंद्र फोडले जाते तेव्हा त्यातून ऊर्जा निर्मिती होते. अणूचे केंद्र फोडण्यासाठी बाहेरून या अणूवर न्यूट्रॉनचा मारा करण्यात येतो. एकदा एखादे अणूचे केंद्र फुटले की त्यातले न्यूट्रॉन्स दुसऱ्या अणूंच्या केंद्राची फोडतोड करतात आणि अशी केंद्र विघटनाची साखळीच सुरू होते. आणि प्रचंड प्रमाणात ऊर्जा निर्मिती होते.

ज्या मूलद्रव्यांचे केंद्र फोडणे सोपे असते त्यांना विघटनशील मूलद्रव्ये म्हणतात. युरेनियम २३८ हे असेच एक विघटनशील मूलद्रव्य आहे. त्याच्या विघटनाने प्लुटोनियम हे मूलद्रव्य तयार होते. युरेनियम २३८ च्या केंद्रात ९२ प्रोटॉन्स आणि १४६ न्यूट्रॉन्स असतात.

हे विघटनशील पदार्थ एका नळकांड्यात भरतात आणि हे विमानातून बॉंबसारखे टाकले जाते. याच्या नळकांड्यात स्फोटक द्रव्य असते त्यामुळे जो स्फोट होतो त्यामुळे युरेनियम किंवा प्लुटोनियमच्या अणूच्या केंद्राचे विघटन व्हायला सुरुवात होते. त्यातून पुढे साखळी प्रतिक्रिया सुरू होऊन मोठा स्फोट होतो.

संग्रहातून

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*२५४२६२७०*

# धर्म, संस्कृती आणि विज्ञान

*या अत्यंत गुंतागुंतीच्या विषयावर डॉ. विजय बेडेकर यांनी २६ डिसेंबर रोजी सादर केलेल्या शोधनिबंधातील काही भागाचा अनुवाद येथे देत आहे. – संपादक*

शनिवार २६ डिसेंबर २००९ रोजी प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे यांच्या वतीने 'भारतीय विज्ञानाने औद्योगिक क्रांतिपूर्व काळात पाश्चात्य जगताला दिलेले योगदान' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या परिषदेचे शीर्षक वाचताच अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. विज्ञानाचा जो अर्थ आपण आज जाणतो, त्या अर्थाने कोणत्याही प्राचीन संस्कृतीने विज्ञानाला योगदान दिलेले नाही हा गैरसमज खोलवर आपल्या मनावर रुजलेला आहे. विज्ञान म्हणजे बुद्धीला पटणारी, तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ विचारसरणी आणि ती पुरेशा प्रमाणात प्राचीन लोकांमध्ये अस्तित्वात नव्हती, हा समज यामुळे दृढ झाला. या प्राचीन लोकांचे जीवन, वैज्ञानिक वृत्ती व स्वतंत्र विचारसरणी यांचा अभाव असणाऱ्या अंधश्रद्धायुक्त धर्माने नियंत्रित केले होते, आणि हा समज वादातीत सत्य म्हणून एकदा का स्वीकारला गेला की पाश्चात्य जगत हे विज्ञानाचे 'उगमस्थान' हा निष्कर्ष आपोआपच मान्य करावा लागतो.

'धर्म' ही संकल्पना विज्ञानाच्या शंभर टक्के 'विरोधी' आहे ही विचारसरणी पाश्चत्त्य असून आपण ती नीटपणाने जाणून घ्यावयास हवी. या संदर्भातील अभिप्रेत धर्म म्हणजे 'ख्रिश्चन' धर्म व विज्ञान म्हणजे 'आधुनिक विज्ञान' होय! ही पाश्चात्य स्वरूपाची धर्म व विज्ञान यातील विसंगती आपोआपच पौर्वात्य धर्म व विज्ञानाशी त्यांचा असणारा संबंध यावर कलम केली जाते. परंतु 'पाश्चात्य' व 'पौर्वात्य' धर्म संकल्पनेत अनेक बाबींमध्ये मूलभूत फरक आहेत. पाश्चात्य धर्मकल्पनेत धर्माला 'धर्मगुरु' व 'धर्मग्रंथ' असला पाहिजे आणि अनुयायांनी या दोहोंची शिकवण पाळलीच पाहिजे हे बंधकारक आहे. पौर्वात्य धर्मामध्ये, विशेषत: हिंदू धर्मात अशा प्रकारे एकच एक धर्मगुरु वा धर्मग्रंथ नाही. आपल्याला योग्य असणाऱ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा स्वीकार वा अव्हेर करण्याचे स्वातंत्र्य अनुयायांना आहे. बौद्ध व जैन या धर्मात धर्मगुरु व धर्मग्रंथ यांची शिकवण आहे; पण त्यांनी आपल्या अनुयायांच्या कला व विज्ञानातील, त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील अभिव्यक्तीवर बंधने घातली नाहीत. तिसऱ्या शतकात 'कामसूत्रे' लिहिणाऱ्या वात्सायनावर धार्मिक भूमिकेवरून कधी टीका झाली नाही. पंधराव्या शतकापर्यंत त्याच्या सूत्रांवर भाष्ये केली गेली. पद्मश्री या बौद्ध भिक्षूने वैषयिक व भौतिक सुखांवर अकराव्या शतकांत 'नागरसर्वस्व' हा ग्रंथ लिहिला. स्वत:च्या धार्मिक श्रद्धेशी संघर्ष न होऊ देता जैन धर्मातील अनेक साधूंनी गणित व ऐहिक विषयक भौतिक विज्ञानावर ग्रंथ लिहिले. वैज्ञानिक लिखाण करण्याला कन्फ्यूशियस तत्त्वज्ञानाने व चीनमधील बौद्ध धर्माने कधीही विरोध केला नाही व बंधने घातली नाहीत.

यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम हे सेमिटिक (semetic) पंथ असून त्यांच्यात निदान सुरुवातीला उगम, इतिहास, प्रचार व भूगोल या बाबींमध्ये सातत्य आहे. भारतीय संस्कृतीच्या संदर्भात हिंदू, बौद्ध व जैन या धर्मांबाबतही असेच म्हणता येईल. पाश्चात्य व पौर्वात्य यांचे विज्ञानातील योगदान समजावून घेण्यासाठी, पाश्चात्य व

पौर्वात्याची विज्ञानाशी असणारी ही 'सांस्कृतिक' बद्धता महत्त्वाची आहे. अशा प्रकारे पाश्चात्य व पौर्वात्य जगतातील वैज्ञानिक इतिहासातील धर्माची भूमिका व त्याचे योगदान हे सारखे नाही. 'सर्व धर्म सारखे असतात' यांसारखी विधाने राजकीय अर्थाने खरी असली तरी व आपली कितीही इच्छा असली तरी खरी नसतात. तसेच मानवी संस्कृतीच्या सुरूवातीच्या काळात विज्ञानाचे असे वैश्विकरण करण्यावर भर देण्याचा प्रयत्न हा सुद्धा सत्याचा अपलाप करतो. पाश्चात्येतर विज्ञानाच्या इतिहासलेखनात त्यामुळे अनेक चुकांचा शिरकाव होतो. तसेच तो सांस्कृतिक बंधांमधील चौकस वृत्तीला बधिर करतो. त्याचबरोबर विविध संस्कृतींमधील कल्पनानिर्मितीच्या शक्यता आणि ज्ञानमीमांसेच्या भिन्नतेलाही आपण नाकारतो. युक्लिडच्या गृहीत-पुरावा पद्धतीप्रमाणे जेव्हा आपण आर्यभटाच्या लेखनाचे विश्लेषण करू पाहतो तेव्हा मग त्यामध्ये आश्चर्य उरत नाही ते यामुळेच.

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी किमान २००० वर्षे तरी भारतात आयुर्वेद वैद्यक अस्तित्वात आहे. पण ते आज 'पर्यायी' वैद्यक ठरले आहे. वास्तविक हे या उलट, म्हणजे 'ॲलोपॅथी' हे 'आयुर्वेदा'ला पर्यायी असले पाहिजे. ख्रिस्तपूर्व व ख्रिस्तोत्तर अशी जी 'कालगणना' आपण करतो, तिच्याबाबतही असेच म्हणावे लागेल. आजकाल अनेक विद्वान, बीपी (BP) म्हणजे 'आताच्या पूर्वी' (बीफोर प्रेझेंट) असा प्रयोग वापरतात. पुरावस्तुशास्त्रज्ञ व भूगर्भ शास्त्रज्ञ ब्राँझयुग, लोहयुग असा निर्देश करतात. वास्तविक या गणनेचा मध्यबिंदू हा सुद्धा ख्रिश्चन धर्माची सुरूवातच आहे. अशा प्रकारे शिक्कामोर्तब करणे वरकरणी साधे, सरळ वाटले तरी तसे ते नाही. यामधून अतिशय खुबीदारपणे पाश्चात्योतर संस्कृतींपेक्षा पाश्चात्य संस्कृती श्रेष्ठ असल्याचे सूचित होते. मानवी विकासाचा इतिहास मांडतांना 'मानव शरीर' रूपक म्हणून वापरले जाते. साहजिकच आधिच्या म्हणजे प्राचिन संस्कृत्यांच्या प्रगतीला किंवा विकासाला 'बाल्यावस्था' म्हणून बघितले जाते.

प्राचीन पाश्चात्येतर विज्ञानांना व कल्पनांना अलीकडे 'एथनिक' हे विशेषण लावण्याचा प्रवाह आहे. उदा. एथनिक वैद्यकशास्त्र, एथनिक गणित, एथनोबॉटनी, एथनो झूलॉजी इ. या संदर्भात अनेक शास्त्रज्ञांनी यशस्वी असे संशोधन केले आहे. परंतु 'एथनो' हे विशेषण मुख्य प्रवाहातील विज्ञानापासून या योगदानाची फारकत करते. या विशेषणातून मागासलेपणा, जातीय, योगायोग, आधुनिक विज्ञानाला लागणाऱ्या विश्लेषक दृष्टीचा अभाव अशा अनेक अर्थच्छटा सूचित होतात. न्यूटन-कार्टेशियन चौकसपणाची प्रतिकृती जी वैज्ञानिक निष्कर्षापर्यंत पोहोचण्यास आवश्यक आहे व जी ग्रीक आहे ती अर्थातच या संस्कृत्यांमध्ये अभिप्रेत नाही. साहजिकच पाश्चात्य वा ग्रीक योगदानाला जेव्हा काळ झुकते माप देत नाही तेव्हा पौर्वात्य कल्पनांची अग्रिमता, अस्सलपणा नाकारला जातो. याचे चांगले उदाहरण म्हणजे कलनशास्त्र (Calculus). १४व्या शतकातील माधव याच्या लेखनात कलनशास्त्राच्या विकासाला आवश्यक असणारे अनेक उल्लेख आहेत, जे न्यूटन वा लेबनीझ यांच्या दोनशे वर्षांपूर्वीचे आहेत; तरीही त्यांचा उल्लेख कलनशास्त्राचे संशोधक असा होतो. ही वस्तुस्थिती विद्वानांना सुमारे दोनशे वर्षे तरी माहीत आहे. हे शास्त्र युरोपात कसे गेले हा पुढील अभ्यासाचा विषय असू शकतो. पण माधवाची ही 'मूळ' कल्पना असल्याचे का नाकारले जाते! अतिशय तार्किकतेचा व विद्वत्तेचा आव आणून शक्य असतील ते सर्व युक्तिवाद करून माधवाचे योगदान नाकारले जाते. हे जुन्या व विद्यमान विज्ञानेतिहास लेखकांच्या मनोवृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. या लेखकांना 'भव्य' विज्ञान कल्पनांचा उगम हा ग्रीक व पाश्चात्य परंपरांच्या योगदानाचा भाग असल्याचे 'प्रशिक्षणच' दिले गेले आहे. हे 'गृहीतप्रमेय' फक्त सिद्ध

करावयाचे एवढेच त्यांच्यावर बिंबवले गेले आहे. या उलट असे गृहीत धरले गेले की पाश्चात्येतर संस्कृतीमध्ये 'पारंपरिकरीत्याच' या क्षमतेचा 'अभाव' होता, मग पुरावे उपलब्ध असूनही या समजुतीच्या जोरावरच अस्सल पुराव्यांनाही दुय्यम स्थान दिले जाते.

रेनासान्स (Renaissance)म्हणजे मुळांकडे परत जाणे. पाश्चात्यांचा असा विश्वास आहे की त्यांची मुळे ख्रिस्तपूर्व काळातील ग्रीक व रोमन संस्कृती आणि तत्त्वज्ञानात आहेत. प्लेटो, पायथागोरस, आर्किमिडिज, युक्लिड व त्यांचे अनेक समकालीन या संस्कृतीचे शिल्पकार आहेत. 'रेनासान्स' ही एक सांस्कृतिक चळवळ होती, की ज्यात कला, विज्ञान, धर्म, तत्त्वज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील मानवी नवनिर्मितीचा समावेश झाला. पाश्चात्त्य विज्ञानाच्या विकासातील 'रेनासान्स चळवळ' ही एक मैलाचा दगड होता हे आता स्वीकारले गेले आहे. विशुद्ध व उपयोजित या दोन्ही कला आणि मानवी जीवनातील सर्व ज्ञानशाखांनी या बदलाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. रेनासान्सची चळवळ ही 'औद्योगिक' क्रांतीची नांदी होती. गॅलिलिओ, ब्रूनो पासून ते आधुनिक काळातील क्लोनिंग पर्यंत ख्रिश्चन धर्माचा असणारा विरोध हा सर्वश्रूत आहे.

युरोप व इतर जगाला असणारे पौर्वात्य संस्कृतीचे, खास करून भारतीयांचे विज्ञान क्षेत्रातील योगदान जाणून घ्यायचे असेल तर, धर्म-संस्कृती-विज्ञान यांतील 'परस्परावलंबित्व' व 'परस्परपूरकता' यांची गुंतागुंत समजावून घ्यावी लागेल. अलीकडील पुरातत्वीय शोध, ज्यात सामुद्री पुरातत्त्वाचाही समावेश आहे, यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीचाही या करता उपयोग होतो. गणितीय-खगोल विज्ञान व बीजगणितातील भारताचे योगदान सर्वश्रुत आहे. इतर अनेक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संशोधन साहित्य आज उपलब्ध आहे. त्यांचा परामर्श घेणे आवश्यक आहे.

आधुनिक विज्ञानाचे वर्चस्व व त्याच्या वैश्वीकरणामुळे प्राचीन विज्ञानाला 'ढेंगूपण' मिळाले आहे. सोळाव्या शतकापासून पाश्चात्त्यांनी उर्वरित जगाचे केलेले 'वसाहतीकरण' ही या भावनेस कारणीभूत ठरते. 'ओरिऐंटेलिझम' (Orientalism) हे या सर्वांचे अंतिम फलित आहे. पाश्चात्येतर जगातील आर्थिक संसाधनांची कमतरता व संशोधनाच्या अपुऱ्या सोयी यांनी वसाहतोत्तर काळात पाश्चात्यांवरील अवलंबित्व वाढवले. प्राचीन किंवा मध्ययुगीन काळात पाश्चात्यांबरोबरचा भारतीय व्यापार हा जरी 'दुतर्फा' असला तरी कल्पनांच्या अग्रिमतेचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा दर्शक मेसापोटोमिया व ग्रीस यांच्या दिशेने वळतो.

औद्योगिक क्रांतिपूर्व काळातील भारतीय विज्ञानाचे युरोपाला झालेले प्रेषण हे समजण्यास सोपे नाही. या प्रेषण क्रियेत, आपण आधी पाहिले त्यानुसार व्यापाराने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या विषयावर आता बरेच लेखी व पुरातत्त्वीय साहित्य ही उपलब्ध आहे. भारताचा व्यापार पाश्चात्यांपुरताच मर्यादित नव्हता. ख्रिस्तपूर्व काळातील काही शतकांपूर्वीच बौद्ध धर्म चीन व काही मध्य आशियाई देशांत पोहोचला होता. ख्रिस्त काळाच्या सुरुवातीपासून भारतीय व्यापार व संस्कृती दक्षिण पूर्व आशियाई देशांतही पोहोचले होते. तत्त्वज्ञान, धर्म आणि विज्ञानावरील शेकडो ग्रंथांचे चीनी, तिबेटी, खोतानी, वीगर व दक्षिणपूर्व आशिआई भाषांत भाषांतर झाले होते. चीनकडे जाणारा व्यापारी-मार्ग मध्य आशियातूनच जातो. चीन व मध्य आशियाई भाषांत असणारे अनेक ग्रंथ मुळातून व भाषांतरीत अशा दोन्ही रूपात या व्यापारी मार्गातून पाश्चात्य संस्कृतीपर्यंत पोहोचले. वास्तविक संस्कृत-पार्शियन/अरेबिक-लॅटिन यांतील प्रेषण संस्कृत-चीनी-मध्य आशियाई-ग्रीक, लॅटिन प्रेषणानंतर चालू झाले. प्रेषणाचा शेवटचा मार्ग हा सोळाव्या शतकातील मिशनरी व वसाहतवादी

राज्यकर्त्यांचे लेखन हा होता. अश्मीभूत व पुरातत्त्वीय वनस्पतीशास्त्र, पुरातत्त्वीय प्राणीशास्त्र व वंशशास्त्र या सर्वांसह आंतरशाखीय व विज्ञानांचा संग्राहक व समावेशक अभ्यास कमीत कमी 'पूर्व ग्रहरहित' दृष्टीने आपणांस निष्कर्षांप्रत पोहोचण्यात उपयुक्त ठरेल. आणि तेच खरे भारतीयांच्या विज्ञानाचा इतिहास लिहण्यास योगदान ठरेल.

(हा संपूर्ण निबंध प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या संकेत स्थळावर वाचता येईल. http:// www.orientalthane.com.)

**डॉ. विजय बेडेकर**

(अनुवाद – **मोहन पाठक**)

सौजन्य – सद्धर्म

●●●

## सहा चुका

रोमन तत्त्वज्ञानी व मुत्सद्दी सिसेरो इसवी सनापूर्वी (१०६–४३) यांनी माणसाच्या सहा चुका कोणत्या हे २००० वर्षांपूर्वी सांगितले व ते आजही खरे आहे. त्या चुका अशा.

१) दुसऱ्यांना चिरडून स्वार्थ साधता येतो हा भ्रम.

२) ज्या गोष्टी बदलता येत नाहीत किंवा दुरूस्त करता येत नाहीत, त्याबद्दल चिंता करण्याची वृत्ती.

३) जी गोष्ट स्वत:ला करता येत नाही ती अशक्य समजण्याची सवय.

४) किरकोळ गोष्टींना महत्त्व देण्याचा हेकेखोरपणा.

५) मनोवृत्ती सुधारण्याकडे दुर्लक्ष आणि वाचन व अभ्यास करण्याची सवय जडविण्याच्या बाबतीत बेफिकीरी.

६) आपले मत दुसऱ्यावर लादण्याचा व त्याला आपल्याप्रमाणे वागण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न.

## ।। मदत ।।

आनंदी राहायचे असेल, तर इतरांना मदत दिली पाहिजे आणि त्यांच्याकडून ती घेतलीही पाहिजे. सध्याच्या अतिखाजगी होत जाणाऱ्या आयुष्यात इतरांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती आपण विसरत चाललो आहोत आणि स्वत:ही इतरांकडून मदत घेत नाही. ज्याला गरज आहे त्याच्याकडे मदतीचा हात पुढे करणे यासारखे सुख कोणते नाही. ही मदत केवळ पैशांची किंवा मोठीच पाहिजे असे गरजेचे नाही. ज्या व्यक्तीला खूप दु:ख झाले आहे, ती निराश झाली आहे, तिच्याशी केवळ चार शब्द बोलून, मोकळेपणाने हसून किंवा केवळ तिच्या खांद्यावर हात ठेवून तुम्ही मदत देऊ शकता. मदतीची भावना मनात असेल, तर ती मनातच ठेवू नका.

अनेकदा आपल्याला वेगवेगळ्या प्रकारच्या मदतीची फार गरज असते. आपण केवळ ती गोष्ट मनात धरतो आणि संबंधित व्यक्ती ती मदत करेल, असे मानून चालतो. तुम्हाला मदत हवी असेल तर ती मोकळेपणाने सांगण्यात गैर काही नाही.

संग्रहातून

●●●

# ‘दिशा’ सूची २००९
## (वर्ष १०)

*दिशाचे वाचक, हितचिंतक श्री. सचिन गराटे गेली ३-४ वर्षे दिशाची वार्षिक सूची पाठवतात. अभ्यासकांच्या दृष्टीने व संदर्भासाठी या सूचीला अतिशय महत्त्व आहे. २००९ सालाची सूची. श्री. गराटे यांचे विशेष आभार*
*– संपादक*

| क्र. | लेखक | लेखाचे नाव | महिना | व/अंक | पृ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | आगरकर, सुधाकर | ० ऑक्सफर्डचे ॲशमोलियन संग्रहालय | डिसें. | ११/१ | ३-४ |
| | | ० ऑक्सफर्डच्या निसर्ग-इतिहास संग्रहालयाला भेट | जुलै | १०/८ | ३१-३२ |
| | | ० ऑक्सफर्डच्या विज्ञान-इतिहास संग्रहालयाला भेट | सप्टें. | १०/१० | ३३-३५ |
| | | ० ऊरूम्ची शहरातील लाल टेकडी | फेब्रु. | १०/३ | ११-१३ |
| | | ० तियान्ची तलाव | जाने. | १०/२ | १५-१७ |
| | | ० तुर्पाणची संस्मरणीय सहल | मे | १०/६ | ३-८ |
| | | ० शिनजँग वस्तुसंग्रहालय (Xinjiang Museum) | जून | १०/७ | ८-१० |
| | | ० होमीभाभा : बहुआयामी व्यक्तिमत्त्व (मराठी अनु. मोहन पाठक) | ऑक्टो. | १०/११ | ३-७ |
| २ | आठल्ये, श्रीनिवास मेघश्याम | ० निखळलेले तारे २००८ (सूची) | फेब्रु. | १०/३ | २३-२७ |
| | | ० वाचन व्यवस्थापन | मार्च | १०/४ | १९-२० |
| | | ० व्यवस्थापनशास्त्रातील पाच ‘स’ कारांचे ग्रंथालयात उपयोजन | जून | १०/७ | २७-२९ |
| | | ० शैक्षणिक ग्रंथालयातील रात्र महाविद्यालयाच्या संदर्भात | ऑक्टो. | १०/११ | १७-१९ |
| | | ० ज्ञानव्यवस्थापनाचे ग्रंथालयातील उपयोजन | जाने. | १०/२ | ९-११ |
| ३ | कर्णिक, प्रदीप | ० चिंतनाचे कवडसे | सप्टें. | १०/१० | ३-७ |
| | | ० श्रवणीय काही – १ | ऑग. | १०/९ | २३-३४ |
| | | ० ज्ञानोबा माझा – पूर्वरंगाचा वृत्तान्त | डिसें. | ११/१ | ८-१० |
| ४ | कळमकर, उषा जयंत | ० संक्रांत एक व्रत | फेब्रु. | १०/३ | ९-१० |

**अवाजवी मदत मिळाली नाही, तरच माणूस व्यवस्थित होतो.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | कुलकर्णी, प्रिती | ○ 'एक रात्र शाळेत'; 'आजी आजोबा शाळेत!' | एप्रि. | १०/५ | ३२-३४ |
| | | ○ ओसामा | नोव्हें. | १०/१२ | २०-२१ |
| ६ | कुवर, मोनिका दि. | ○ ज्येष्ठाने आपली कुटुंबव्यवस्था कशी सांभाळावी | मार्च | १०/४ | २१-२२ |
| ७ | गराटे, सचिन | ○ एक तरी 'वारी' अनुभवावी (वारी:एक शोध-वृत्तान्त) | मे | १०/६ | २६-२९ |
| | | ○ 'दिशा' सूची २००८ | फेब्रु. | १०/३ | ३-६ |
| ८ | गाणार, शशिकांत | ○ आधुनिक कर्मयोगी - पू. पांडुरंगशास्त्री आठवले | ऑक्टो. | ११/११ | १६,२३ |
| | | ○ ग्राम विकास - राष्ट्र विकास | मार्च | १०/४ | २८-३० |
| | | ○ भारतीय संस्कृती आणि प्रसार माध्यमे | जाने. | १०/२ | १२-१४ |
| ९ | गोखले, जयंत | ○ निष्ठावान ग्रंथोपासक - शरद जोशी | जुलै | १०/८ | १४-२३ |
| १० | जोशी, अुत्तम | ○ भारतीय नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! स्वागत यात्रा | एप्रि. | १०/५ | १४-२३ |
| ११ | जोशी, शरद | ○ साहित्य जगत | ऑक्टो. | १०/११ | २६-३१ |
| १२ | देशपांडे, विशाखा | ○ संधी देणारी गवाक्षे | ऑक्टो. | १०/११ | ८-१० |
| | | ○ समान शिक्षणाचा विचार | डिसें. | ११/१ | ५-७ |
| | | ○ शाळा - मुलांची गरज | नोव्हें. | १०/१२ | ३-५ |
| १३ | देशमुख, संध्या | ○ संगीत शिक्षकांची भूमिका आणि नव्या शिक्षण प्रणालीची आवश्यकता | डिसें. | ११/१ | १८-२४ |
| १४ | नाडकर्णी, नरेंद्र | ○ पूर्व आणि पश्चिम | मार्च | १०/४ | २३-२७ |
| | | ○ बोरकरांची काव्यनिर्मिती - एक आध्यात्मिक साधना | जाने. | १०/२ | २८-३५ |
| १५ | पटवर्धन, अंजली | ○ वाढदिवसाचे वाढते प्रस्थ! | ऑग. | १०/९ | २२,३४ |
| १६ | पाटील, मा. ना. | ○ आयुष्यात कायम आठवणीत राहिलेली घटना | फेब्रु. | १०/३ | ७-८ |
| १७ | पाठक, मोहन | ○ मुलाखत - एका समर्पित कार्यकर्त्याची | मार्च | १०/४ | ३४-३५ |
| | | ○ मोर : माणसाच्या जीवनातला | मे | १०/६ | ३०-३७ |
| १८ | बारसे, नारायण | ○ कोकण विभाग सार्वजनिक ग्रंथालय संघतालिका | मार्च | १०/४ | ३४-३५ |
| १९ | बेडेकर, वा. ना. | ○ शिक्षणमहर्षी कै. वा. ना. बेडेकर यांच्या लेखणीतून | एप्रि. | १०/५ | २८-२९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | भिडे, आशा | ० करो जतन यापुढे प्रभुपिता अनाथा सदा | सप्टें. | १०/१० | १२-१३ |
| | | ० द्वारका दर्शन | नोव्हे. | १०/१२ | १८-१९,२१ |
| | | ० पालकनीती | जून | १०/७ | २२-२४ |
| | | ० माझी माय सरस्वती | ऑग. | १०/९ | ५-१० |
| | | ० या नवनवल नयनोत्सवा नि श्रवणोत्सवा | एप्रि. | १०/५ | ६-११ |
| | | ० ये आकाशवाणी है | जुलै | १०/८ | ६-७ |
| | | ० संगीत संन्यस्त ज्वालामुखी | मे | १०/६ | २०-२२ |
| | | ० सुख मिळते का हो बाजारी? | मार्च | १०/४ | ३-५ |
| २१ | मठ, शं. बा. | ० उपनिषदे : ऋषींनी जगाला दिलेली देणगी (लेखांक १) | डिसें. | ११/१ | ११-१५ |
| | | ० गीता आणि दैनंदिन जीवन (लेखांक २) | जाने. | १०/२ | ३-५ |
| | | ० गीता आणि दैनंदिन जीवन (लेखांक ३) | फेब्रु. | १०/३ | १४-१६ |
| | | ० प्राचीन ते अर्वाचीन कालखंडातील भारतवर्षातील स्त्री-शिक्षण पद्धती आणि त्याचे समाजातील स्थान | मार्च | १०/४ | ९-१४ |
| | | ० मानवा समोरील प्रश्नचिन्ह | एप्रि. | १०/५ | ३-५ |
| | | ० मुक्ताई | ऑग. | १०/९ | ११-१४ |
| | | ० संत कान्होपात्रा | ऑक्टो. | १०/११ | ११-१३ |
| | | ० संत गोरोबा कुंभार | जुलै | १०/८ | ८-११ |
| | | ० संत जनाबाई | सप्टें. | १०/१० | ८-११ |
| | | ० सनातन धर्माची मूलतत्त्वे | नोव्हें. | १०/१२ | ८-१७ |
| | | ० ज्ञान आणि विज्ञान समन्वय - वेदान्त | जून | १०/७ | ३-७ |
| २२ | माने, यशवंत | ० किमती वस्तू | नोव्हें. | १०/१२ | ६-७ |
| | | ० गृहस्वामिनी | डिसें. | ११/१ | १६-१७ |
| | | ० दान | सप्टें. | १०/१० | १४-१६ |
| | | ० परमेश्वर प्राप्तीचा मार्ग | ऑक्टो. | १०/११ | १४-१५ |
| | | ० परमेश्वराशिवाय धन व्यर्थ असते | एप्रि. | १०/५ | १२-१३ |
| | | ० पूर्वजन्मातले संचित | जून | १०/७ | २५-२६ |
| | | ० मन एक दैवी शक्ती | ऑग. | १०/९ | ३-४ |

**तुम्ही हसून साद दिलीत, तर प्रतिसादही हसरा मिळतो.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ० योग्य चिंतन आणि संयम | जुलै | १०/८ | ३-५ |
| | | ० राग | जाने. | १०/२ | ६-८ |
| | | ० शांती | मार्च | १०/४ | ३१-३२ |
| | | ० सत्संग | मे | १०/६ | २३/२५ |
| | | ० स्वार्थ | फेब्रु. | १०/३ | २८/२९ |
| २३ | लागू, सुरेंद्र | ० निसर्गरम्य अंदमान - एक पवित्र तीर्थक्षेत्र | मे | १०/६ | ९-१३ |
| २४ | शेंडये, विश्वनाथ | ० एका वादळी व्यक्तिमत्त्वाची ओळख | जुलै | १०/८ | १२-१४ |
| २५ | शेवडे, मैत्रेयी | ० निरोप समारंभ | मार्च | १०/४ | ३३ |
| २६ | साने, यशवंत | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | जाने. | १०/२ | २२-२७ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | फेब्रु. | १०/३ | १७-२२ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | मार्च | १०/४ | १५-१८ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | एप्रि. | १०/५ | २४-२७ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | मे | १०/६ | १४-१९ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | जून | १०/७ | ११-२१ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | जुलै | १०/८ | १८-२६ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | ऑग. | १०/९ | १५-२१ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | सप्टें. | १०/१० | १७-२५ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | ऑक्टो. | १०/११ | ३२-३६ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | नोव्हें. | १०/१२ | २४-३३ |
| | | ० भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | डिसें. | ११/१ | २७-३३ |


*मा. संपादक, दिशा,*

*स. न.*

*दिशातील सर्व लेख वाचनीय असतात व एकूणच अंक संग्राह्य असतो. शैक्षणिक संस्था असा उपक्रम राबवते याचे विशेष कौतुक व अभिमान वाटतो. दिशातील संपादकीयांचे व निवडक लेखांचे पुस्तकरूपाने आपण प्रकाशन करावे असे वाटते.*

*आशिष कुलकर्णी, डोंबिवली (पूर्व)*

**तक्ता क्र. १ – संपादकीय**

| महिना | वर्ष/अंक | संपादकीय |
|---|---|---|
| जानेवारी | १०/२ | भारताच्या सुरक्षिततेची दशा आणि दिशा |
| फेब्रुवारी | १०/३ | माहिती उपलब्धतेच्या दिशेने |
| मार्च | १०/४ | शिक्षण आणि सामाजिक संस्था |
| एप्रिल | १०/५ | सामूहिक विश्वासाला तडे |
| मे | १०/६ | शिक्षण म्हणजे शाळा हे समीकरण चुकीचे आहे |
| जून | १०/७ | बोधप्रद अहवाल |
| जुलै | १०/८ | 'गुरु' महात्म्य |
| ऑगस्ट | १०/९ | स्वाइन फ्ल्यू आणि सामाजिकतेचे भान |
| सप्टेंबर | १०/१० | स्मरण – भाभांचे |
| ऑक्टोबर | १०/११ | अंधारयात्रेच्या दिशेने |
| नोव्हेंबर | १०/१२ | नोबेल पुरस्कार |
| डिसेंबर | ११/१ | कोपनहेगनच्या निमित्ताने |

**तक्ता क्र. २ – परिसरवार्ता**

| महिना | वर्ष/अंक | पृष्ठ | वृत्त संकलक |
|---|---|---|---|
| जानेवारी | १०/२ | ३६–४० | |
| फेब्रुवारी | १०/३ | ३०–४० | विदुला वैद्य, डॉ. मुग्धा कुलकर्णी, चंद्रकांत शिंगाडे |
| मार्च | १०/४ | ३६–३९ | |
| एप्रिल | १०/५ | ३५–३९ | |
| मे | १०/६ | ३८–३९ | प्रा. प्रज्ञा राजेबहादूर |
| जून | १०/७ | ३६–३९ | संदीप भावसार |
| जुलै | १०/८ | ३४–४० | |
| ऑगस्ट | १०/९ | ३५–४० | डॉ. मुग्धा कुलकर्णी, प्रा. कीर्ती आगाशे |
| सप्टेंबर | १०/१० | | चंद्रकांत शिंगाडे |
| ऑक्टोबर | १०/११ | ३७–४० | |
| नोव्हेंबर | १०/१२ | ३४–४० | प्रा. प्रज्ञा राजेबहादूर, प्रा. अनंत गद्रे, श्री. वि. करंदीकर |
| डिसेंबर | ११/१ | ३४–३८ | चंद्रकांत शिंगाडे |

**भावनेशी निगडित असणारी ऊर्जा व्यक्तीला कृतिप्रवण करते.**

## तक्ता – ३ पुस्तक परिचय

| क्र. | मूळ ग्रंथ | लेखक | प्रकाशक | परीक्षणकर्ता | परीक्षणाचे शीर्षक | महिना | पृ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अभंग संजीवन | श्री. द. (मामा) देशपांडे | श्रीवामनराज प्रका., पुणे | आशा भिडे | अभंग संजीवन | जाने. | १८–२१ |
| २ | आंग्ल वाङ्मयातील कल्पना विलास, वास्तव, स्त्री आणि चित्रपटसृष्टी यांचा मागोवा | रा. रा. जोशी | टॉप पब्लिकेशन, डोंबिवली | शरद जोशी | आंग्ल वाङ्मायातील कल्पना विलास ... यांचा मागोवा | जून | ३१ |
| ३ | कीर्तिवंत धन्वंतरी | अशोक चिटणीस | परचुरे प्रका., मुंबई | मोहन पाठक | कीर्तिवंत धन्वंतरी वाचनीय पुस्तक | नोव्हें. | २२–२३ |
| ४ | ग्रंथसामर्थ्य | प्रदीप कर्णिक | डिंपल प्रका., वसई | मोहन पाठक | ग्रंथसामर्थ्याचा अनोखा अभ्यास : ग्रंथसामर्थ्य | ऑक्टो. | २४–२५ |
| ५ | गीतार्थ विलासित | दिवाकर घैसास | घैसास मित्र मं. मुंबई | शरद जोशी | गीतार्थ विलसित | जुलै | २९ |
| ६ | द्विगुणीत | शुभा चिटणीस | परचुरे प्रका., मुंबई | मोहन पाठक | सहजीवनावरील वेगळे पुस्तक – द्विगुणीत | एप्रिल | ३०–३१ |
| ७ | धगधगते यज्ञकुंड | श्रीकांत नेर्लेकर | व्यास क्रिएशन | सुरेंद्र लागू | धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर | सप्टेंबर | २६–२८ |
| ८ | धर्मयज्ञ (मासिक) | जयश्री आपटे (संपा.) | गीता फाऊंडेशन, पंढरपूर | शरद जोशी | अध्यात्म विषयाला वाहिलेले ‘धर्मयज्ञ’ मासिक | जून | ३१–३२ |
| ९ | नोबेल आणि नोबेल पुरस्कार | अनिल चक्रदेव | आरती प्रकाशन | शरद जोशी | नोबेल आणि नोबेल पुरस्कार पुस्तक प्रेरणादायी | जुलै | २९–३० |
| १० | प्रकाशाची वाट | अप्पा परचुरे | परचुरे प्रका., मुंबई | सुरेंद्र लागू | प्रकाशाची वाट | जुलै | १५–१७ |
| ११ | मराठी लाक्षणिक शब्दकोश | र. ल. उपासनी | साहित्य प्रसार, | शरद जोशी | मराठी लाक्षणिक शब्दकोश | सप्टें. | ३०–३१ |
| १२ | ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद, | भीमराव कुलकर्णी | – | शरद जोशी | डॉ. भीमराव सदाशिव कुलकर्णी यांचा | ऑक्टो. | २६–२७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५ खंड | | | | ऋग्वेदाचा मराठी शास्त्रीय अनुवाद ग्रंथराज | | |
| १३ | वसंत-अमेरिका २००९ (मासिक) | दिलीप देशपांडे (संपा.) | - | शरद जोशी | अमेरिका विशेषांक | सप्टें. | ३१-३२ |
| १४ | 'व्रण' | जी. ए. बुवा | - | प्रदीप कर्णिक | मौनीबुवा | ऑक्टो. | २०-२१ |
| १५ | शंकर दिग्विजय | विद्यारण्य स्वामी | सानिक प्रका., पुणे | शरद जोशी | शंकर दिग्विजय ग्रंथराज | जून | ३२-३३ |
| १६ | संख्या संकेत कोश | श्रीधर हणमंते | प्रसाद प्रका., पुणे | शरद जोशी | विविध विषयांवरील माहितीचा खजिना असलेला संग्राहय संख्या-संकेत कोश | जून | ३३-३५ |
| १७ | संध्या समालोचन | दत्तात्रय मो. रबडे | पुष्पप्रेम प्रका., पुणे | शरद जोशी | संध्या समालोचन | सप्टे. | २९-३० |
| १८ | सार्थ मंत्रराज (प्रवचन) | श्रीधरस्वामी | मारूतीबुवा रामदासी सज्जनगड | मोहन पाठक | सार्थ मंत्रराज | नोव्हें. | २३,४० |
| १९ | सैलावलेलां आत्मभान | श्रीनिवास आठल्ये | मुग्धा प्रका., ठाणे | दीपक संगीत | जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या कविता | ऑक्टो. | २२-२३ |
| २० | स्त्री शक्ती | पुष्पलता शेट्ये | पुष्पलता शेट्ये | शरद जोशी | स्त्रीशक्ती - एक प्रेरणादायी पुस्तक | जुलै | ३० |
| २१ | श्रीमत् श्रीसमर्थ रामदास स्वामी विरचित श्रीमनाचे श्लोक-चरणसूची | नानासाहेब मोरे | दासबोध अभ्यास मंडळ, मुंबई | मोहन पाठक | मनाच्या श्लोकांची चरणसूची | डिसें. | २५-२६ |

**संकलन - श्री. सचिन गराटे**
मुंबई

***सुविचारांबद्दल :***

*प्रत्येक पानावर एक सुविचार देण्याचा आमचा हेतू सुविचार तुमच्यापर्यंत पोहोचवणे हा आहे. वैचारिक दुर्भिक्ष्य व विचारांचे प्रदूषण असलेल्या आजच्या काळात चांगले विचार वाचले तरी मनाला उभारी मिळते. शिवाय ते आचरणात आणण्याची प्रेरणा ही मिळते. अनेक वाचक हे सुविचार आवडत असल्याचे सांगतात.*

*संपादक*

**जगातल्या सर्व घटनांकडे संशयाने पाहिलास दुःख वाट्याला येते.**

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (पूर्व प्राथमिक विभाग)

पूर्व प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ दि. २२ डिसें. रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. करंदीकर व प्रमुख पाहुणी म्हणून डोंबिवलीच्या पाटकर विद्यालयाची कु. शिवानी गुलाब पाटील हे उपस्थित होते. कु. शिवानीने 'अफझलखानाचा वध व जिजाऊंचे डोहाळे' यांचा इतिहास आपल्या वकतृत्त्वातून अतिशय प्रभावीपणे विद्यार्थी व पालकांसमोर सादर केला.

'वार्षिक स्नेहसंमेलन' ह्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यापूर्वी 'ये देश है मेरा, स्वदेश है मेरा' ह्या गाण्याच्या कडव्याने कार्यक्रमाला सुरुवात केली. कारण २६ नोव्हें. रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांना हा कार्यक्रम समर्पित करावयाचा होता म्हणून 'देशभक्तिपर गीते' हा विषय दिला होता. कार्यक्रमात 'मराठी पाऊल पडते पुढे, जय जय महाराष्ट्र माझा, जयोस्तुते जयोस्तुते व नन्हा मुन्ना राही हूँ' इ. गाणी सादर करण्यात आली.

ह्यावर्षी नवीन उपक्रम म्हणजे शाळेत 'पालकशाळा' घेण्यात आली. उत्साही पालकांनी संपूर्ण दिवस शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवण्याचा आनंद लुटला.

पूर्व प्राथमिक विभागाच्या लहान व मोठ्या शिशुच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. लहान शिशुच्या 'जोडीची चप्पल शोधणे, अडथळ्याची शर्यत' व मोठ्या शिशुच्या 'उलटे चालणे, संगीत खुर्ची' ह्या स्पर्धा घेण्यात आल्या. कला चिल्ड्रन ॲकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत २४ मुलांना सुवर्णपदक व प्रशस्तिपत्रके देण्यात आली व पुढील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग)

➢ स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित 'आदर्श विद्यार्थी' निवडीत मुलाखतीद्वारे निवड प्रक्रियेत १६ विद्यार्थ्यांपैकी यश सारोळकर (९ अ) व ऋतुजा चंद्रराव (९ अ) यांची निवड करण्यात आली.

➢ 'रोटरी क्लब ठाणे, नॉर्थ' आयोजित Science Festival प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रज्ञेश सरवणकर व मिहिर गाडगीळ (१० अ) यांच्या गटास चौथा क्रमांक प्राप्त झाला. रोख रक्कम व पुस्तके असे पारितोषिकाचे स्वरूप होते.

➢ ५ डिसें. रोजी सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळेत घेण्यात आलेल्या कै. बाळू बाकरे संगीत स्पर्धेत तबला वादनात दिनेश काणेकर (१० ब) यांस प्रथम क्रमांकाचे (विभागून) पारितोषिक प्राप्त झाले.

➢ 'पर्यावरण दक्षता मंच', 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ', 'ठाणे महानगरपालिका' आयोजित 'आपलं पर्यावरण' लघु चित्रपट महोत्सव ' ०९ गडकरी रंगायतन ठाणे येथे इ. ७ वी व ८ वी अ, बचे विद्यार्थी शिक्षकांसहीत उपस्थित होते.

➢ 'एड्स' दिनानिमित्त साजरा केलेल्या सप्ताहात 'एड्स' विषयाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आयोजित रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन 'ठाणे वैभव'चे श्री. निखिल बल्लाळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय काँग्रेस ठाणे जिल्हा महिला अध्यक्ष सौ. रेखा मिरजकर व श्री. विनोद गुप्ता -

कलाकृती युथ असोसिएशन' ठाणे यांनी विशेष भेट देऊन विद्यार्थ्यांच्या रांगोळ्यांचे विशेष कौतुक केले.

➢ 'द ब्लाइंड डॉक्टर जेकब बोलोटिन स्टोरी' या पुस्तकाचा अनुवाद शाळेचे माजी पालक श्री. मधुकर मंडलेकर यांनी 'मात अंधत्वावर' या पुस्तकरूपात केला आहे. स्वत:च्या अंधत्वावर मात करीत पुस्तकातील गोष्टी विद्यार्थ्यांपुढे सादर केल्या.

➢ सुवर्ण महोत्सवानिमित्त ५ वी १० वी साठी पाढे पाठांतर व ९ वी १० वी साठी इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.

➢ 'पर्यावरण दक्षता मंच' आयोजित 'निसर्गमेळा' रविवार ६ डिसें. सकाळी ९ ते सांय. ७ या वेळेत पिपल्स् एज्युकेशन सोसायटी कोपरी, ठाणे येथे भरविण्यात आला. या निसर्गमेळ्यात 'झाडे ओळखा' या स्पर्धेत ओंकार शिर्के ७ ड यास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

➢ श्री माँ विद्यालयातर्फे आयोजित 'आंतर शालेय लोकनृत्य स्पर्धेत' ७ वी ते ९ वीच्या विद्यार्थिनीने सादर केलेल्या लोकनृत्यास तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

➢ 'रंगतरंग' मंचातर्फे आयोजित वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्रिया टिपाले (९ वी) हिला प्रथम व ऐश्वर्या राणे (९ वी) हिला तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

➢ 'न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्था' तर्फे आयोजित पहिल्या बाल साहित्य संमेलनात गट - ४ रंगभरण - दिव्या महाबदी (८ अ) गट - २ हस्ताक्षर - अमेय बुगदे (८ ब) यांस तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

➢ कला विकास संस्था आयोजित रंगबहार राज्यस्तरीय रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत सुयश बागवे (५ वी) याला रंगभरण स्पर्धेत विशेष कलागुणवत्ता पुरस्कार प्राप्त झाला. तसेच विद्यार्थ्यांना कलेकडे आकृष्ट केल्याबद्दल सौ. नेत्रा सोनवणे व उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणून सौ. उषा कळमकर यांना सन्मानपत्र प्राप्त झाले.

➢ कै. सुमतीबाई टिल्लू व कै. अ. धो. टिल्लू आदर्श शिक्षक पुरस्कार मा. उपमुख्याध्यापिका सौ. सुनिता देशपांडे यांना प्राप्त झाला.

➢ २० सप्टें. २००९ रोजी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा' तर्फे घेण्यात आलेल्या 'मराठी उच्चस्तर परीक्षेचा' निकाल १००% लागला असून प्रतीक शिंदे (८ अ) विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

➢ बी.एन्. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्सतर्फे घेण्यात आलेल्या ऑर्चिड पेंटींग स्पर्धा डिसें ०९ रोजी घेण्यात आली. त्या स्पर्धेत इ. ८ वी ते १० वीच्या गटात कु. नम्रता शर्मा (१० ब) हिला द्वितीय क्रमांक मिळाला.

➢ सप्टें. २००९ मध्ये 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे' घेण्यात आलेल्या प्री-एलिमेंटरी परीक्षेचा निकाल १००% तर एलिमेंटरी परीक्षेचा निकाल ९८% लागला. परीक्षेस अनुक्रमे १४२ व १२८ विद्यार्थी बसले होते.

➢ 'फेडरेशन स्टेट जिम्नॅस्टिक चॅम्पियनशिप' या पुणे येथे झालेल्या स्पर्धेत प्रिती टिपाले (७ अ) हिच्या संघाला (ठाणे) प्रथम क्रमांक मिळाला तसेच तिला सुवर्णपदक प्राप्त झाले.

➢ 'श्री माँ बालनिकेतन' या शाळेमार्फत झालेल्या १७ व्या आंतरशालेय स्पर्धेत प्रणिता काळभोर (७ अ) हिला मराठी वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक व सुवर्णपदक प्राप्त झाले. तसेच मृण्मयी कोळी १० अ हिला रांगोळी स्पर्धेत तृतीय क्रमांक व ब्राँझ पदक प्राप्त झाले.

## सुवर्ण महोत्सवाचे कार्यक्रम

### ✧ कार्टूनच्या जगात :

शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांपैकी दि. ८ जाने. रोजी मा. सौ. शमा क्षीरसागर यांनी कागदापासून कार्टून बनविणे ही कार्यशाळा घेतली. त्यात ८५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कार्यशाळेत टॉम आणि जेरी, डोनाल्ड डक, मिकी माऊस, कोंबडा, मुखवटा, गिटींग कार्डस् यासारखी सुंदर कलानिर्मिती करून दाखविल्या. कागदापासून (कोलज पद्धतीने) रंगाच्या ऐवजी रंगीत कागदांचा कसा उपयोग करता येतो तसेच त्यांची कापण्याची, चिकटविण्याची विशिष्ट पद्धत व टाकाऊतून सुंदर कलानिर्मिती कशी करता येऊ शकते याचे प्रात्यक्षिक सौ. क्षीरसागर यांनी करून दाखवले. कमीत कमी वेळात विद्यार्थ्यांनी उत्तम कार्टून तयार केले.

कार्यक्रमाचे संयोजन मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. विलास कोळी यांनी केले.

### ✧ 'मध्ययुगीन ठाणे' :

डॉ. दाऊद दळवी यांचे 'मध्ययुगीन ठाणे' या विषयावर व्याख्यान दि. ४ जाने. रोजी झाले.

इतिहास तुमचा आहे, स्थानिक इतिहास प्रेरणादायी आहे. चांगला इतिहास असणाऱ्या ठाणे शहराचे आपण नागरिक आहोत व याला २००० वर्षांची परंपरा आहे. या मध्ययुगाचा आलेख उंचावलेला आहे. यात कला, साहित्य, भाषा यांची भरभराट झाली आहे असे सांगून या मध्ययुगातील राजांच्या कारकिर्दीचा आढावा उत्तम भाषा शैलीत मांडला. या सर्व ऐतिहासिक नोंदी सांगून विद्यार्थ्यांच्या मनात ठाणे शहराचा अभिमान जागृत केला. ठाणे कारागृहाचीही परंपरा किल्ल्याची आहे. अनेक राजकैद्यांना येथे ठेवण्यात आले. इ. तपशीलातून विद्यार्थ्यांच्या मनात इतिहासातील शाश्वत मूल्य सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. धोंडे यांनी केले. आभार प्रदर्शन पर्यवेक्षक श्री. गवई यांनी केले. कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष मा. श्री. मा. य. गोखले उपस्थित होते.

### ✧ क्रिकेटचे विश्व व प्रश्नोत्तरे :

क्रिकेटचे विश्व व प्रश्नोत्तरे या विषयावर इ. १० वी साठी 'क्रिकेटमधील रोमहर्षक लढती' या पुस्तकाचे लेखक मा. श्री. सुहास क्षीरसागर यांचे व्याख्यान आयोजित केले गेले.

या व्याख्यानाद्वारे क्रिकेटचा भूतकाळही सुवर्णाक्षरांनी नोंदवावा हे सांगताना काही उत्तम क्रिकेटवीरांचे पराक्रम, गाजलेल्या मॅचेस, त्यांचे विशेष वगैरेंचा आढावा अगदी २०-२० पर्यंत सहजपणे ओघवत्या भाषेत मांडला. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून प्रत्येक उत्तराला बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष मा. श्री. मा. य. गोखले उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी केले व सूत्रसंचालन श्री. जाधव यांनी व आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापिका सौ. देशपांडे यांनी केले.

### ✧ चालता - बोलता संगणक :

'चालता बोलता संगणक' या विषयावर मा. श्री. लक्ष्मण गोगावले यांचे इ. ७ वी साठी व्याख्यान आयोजित केले होते. विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर होऊन गणिताची आवड निर्माण व्हावी म्हणून गणितातील काही खेळ, गमती जमती, मोठमोठ्या आकड्यांची बेरीज-वजाबाकी वगैरे आकडेमोडी त्यांनी

कौशल्याने कशा कराव्यात, याबद्दल हसत-खेळत मार्गदर्शन केले. त्यांची प्रकाशित १२ पुस्तकांचा संच अनेक विद्यार्थ्यांनी संग्रही ठेवण्यासाठी घेतला. सोप्या पद्धतीने गणिताचा प्रचार व प्रसार करणारे श्री. गोगावले हे आधुनिक भास्कराचार्यच आहेत. कार्यक्रमाचे संयोजन मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ. अपर्णा भट यांनी केले.

**✧ महाराष्ट्रातील प्रत्येकाचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज :**

२ जाने. रोजी मा. गुलाबराव पाटील यांनी विद्यार्थ्यांसमोर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातील 'अफजलखानाचा वध' तडफदार भाषेत मांडला.

श्री. गुलाबराव पाटील हे डोंबिवली येथील पाटकर विद्यालयात शारीरिक शिक्षण विषयाचे शिक्षक आहेत. आपली नोकरी सांभाळून आपल्या आवडीचा विषय म्हणून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रावर व्याख्याने देतात. आजपर्यंत हजारो कार्यक्रम त्यांनी केले आहेत त्या कार्यक्रमातून मिळणारे मानधन श्री. पाटीलसर आपल्या गावातील शाळेसाठी उपयोगात आणतात.

महाराष्ट्रातील प्रत्येकाचे दैवत असणाऱ्या छत्रपतींचे चरित्र ऐकून आमच्या विद्यार्थ्यांच्या मनात स्वदेशाबद्दल स्वाभिमान निर्माण व्हावा या हेतूने आयोजित केलेल्या कार्यक्रमाबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांना मनापासून धन्यवाद दिले.

**✧ मनाचे सौंदर्य वाढवा :**

दि. ५ जाने रोजी डॉ. राम साठ्ये यांनी समर्थ रामदास स्वामींच्या चरित्रावर आणि मनाच्या श्लोकांवर आधारित, दिलेल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मनाच्या सौंदर्यांची, ते सौंदर्य वाढविण्याची आवश्यकता पटवून दिली. समर्थ रामदास स्वामींप्रमाणे प्रयत्नांची पराकाष्ठा करून समाजाचे ऋण लक्षात घेऊन राष्ट्राची प्रगती करण्यासाठी प्रथम मनाची मशागत करावी हे अत्यंत तळमळीने सांगितले.

डॉ. राम साठ्ये हे पुण्याचे प्रसिद्ध पॅथॉलॉजिस्ट आहेत. आपला व्यवसाय सांभाळून समर्थ वाङ्मयाच्या प्रचार - प्रसारार्थ झपाटून काम करत आहेत. नुकतीच त्यांनी www.samaratharamdas400.in ही वेबसाईट तयार केली आहे.

विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल मा. मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांना विशेष धन्यवाद दिले.

✧ श्री. आनंद दिवाकर घैसास, वैज्ञानिक अधिकारी, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, टाटा मूलभूत संशोधन संस्था, मुंबई यांचे 'आपले विश्व किती मोठे - किती छोटे' या विषयावरील व्याख्यान दि. ६ जानेवारी रोजी झाले. विद्यार्थ्यांना अनेक सोपे, साधे प्रश्न विचारून त्यांनी विद्यार्थ्यांनाही आपल्या व्याख्यानात सहभागी करून घेतले. तसेच त्यांना विचारप्रवृत्त केले. स्वत:पासून विश्वाची सुरूवात होते हे सांगून विविध स्लाइड्सच्या साहाय्याने विश्वाच्या मोठे व छोटेपणाविषयी संकल्पना स्पष्ट करून सांगितली. ऑलिंपियाड परीक्षा, प्रशिक्षण याविषयीची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. व्याख्यानाच्या शेवटी विद्यार्थ्यांना 'Sky is the lower limit, Let us conquer it fast' असेही सांगितले.

मा. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मा. उपमुख्याध्यापिका सौ. देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. सौ. सुमिता माने यांनी सूत्रसंचालन केले.

✧ I.T. क्षेत्रातील तज्ज्ञ व सुप्रसिद्ध लेखक मा. श्री. अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान दि. ९ जाने. रोजी ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी झाले.

या व्याख्यानात त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या निर्मिती प्रक्रियेबद्दलची माहिती सांगितली. लहानपणापासून मिळालेला मान्यवर व्यक्तींचा सहवास, अनेक विषयांवरील पुस्तकांचे केलेले वाचन यातूनच पुस्तके लिहिण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या 'बोर्डरूम' या पुस्तकानेही अनेकांना प्रेरणा दिली.

जीवनात यशस्वी होण्यासाठी सर्वोत्तमाचा ध्यास, उत्तम संवाद कौशल्य, नेतृत्व, उद्योजकता, धोका पत्करण्याची तयारी असावी लागते असेही त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांनाही समाधानकारक उत्तरे दिली.

मा. मुख्या. सौ. कळमकर यांनी सद्विचारांचे महत्त्व प्रास्ताविकातून सांगितले. मा. उपमुख्याध्यापिका सौ. देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय सौ. सुमिता माने यांनी करून दिला. या कार्यक्रमानेच व्याख्यानमालेची सागंता झाली.

✧ मा. श्री. मोहन हरी आपटे यांचे 'खगोलशास्त्राचे सुवर्णयुग' हे व्याख्यान झाले. आपल्या या व्याख्यानात श्री. आपटे यांनी खगोलशास्त्राचा जवळजवळ १०० वर्षांचा थोडक्यात आढावा घेतला. गॅलिलिओने केलेल्या संशोधनापासून सुरूवात करून २००९ सालात चंद्रावर पाठवण्यात आलेल्या चांद्रयानापर्यंतचा प्रवास त्यांनी विद्यार्थ्यांना घडवला तो दृक्श्राव्य माध्यमातून. त्यामुळेच अतिशय दुर्मिळ छायाचित्रे, व्हिडिओक्लिप्स विद्यार्थ्यांना पाहता आल्या. यामुळे व्याख्यानातील रंजकता वाढली.

मा. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी सुसंस्कारित विचार, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन यांचे महत्त्व प्रास्ताविकात सांगितले. आभार प्रदर्शन मा. उपमुख्या. सौ. देशपांडे यांनी केले. सूत्रसंचालन व व्याख्यात्यांचा परिचय सौ. सुमिता माने यांनी करून दिला.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

**एलिमेंटरी व ईंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २००९-२०१० :**

| एलिमेंटरी श्रेणी परीक्षा | ईंटरमिजिएट श्रेणी परीक्षा |
|---|---|
| एकूण विद्यार्थी - ६२ | एकूण विद्यीार्थी - ३० |
| उत्तीर्ण विद्यार्थी - ५९ | उत्तीर्ण विद्यार्थी - २५ |
| 'अ' श्रेणी - ०६ | 'अ' श्रेणी - ०२ |
| 'ब' श्रेणी - २१ | 'ब' श्रेणी - ०८ |
| 'क' श्रेणी - ३२ | 'क' श्रेणी - १५ |

**वार्षिकोत्सव २००९-२०१० :**

माध्यमिक विभागाचा वार्षिकोत्सव १७ डिसेंबर ०९ रोजी संपन्न झाला. श्री. अतुल कुलकर्णी, मराठी व हिंदी चित्रपटातील सुप्रसिद्ध अभिनेता व आमची माजी विद्यार्थिनी डॉ. अश्विनी भट हे प्रमुख पाहुणे होते. मुख्याध्यापिका कोल्हटकर मॅडम यांनी पालकांचे स्वागत करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर त्यांनी २००९-२०१० च्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. मंडळाचे ज्येष्ठ सभासद श्री. श्री. वि. करंदीकर यांनी कार्यक्रम यशस्वी होवो असे आशीर्वादरुप भाषण करून कार्यक्रमाला सुरुवात केली. शालेय आणि शालेतर गोष्टींमधे प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी विविध प्रांतांची नृत्य तसेच छोट्या नाटिका सादर केल्या.

**क्रीडादिन २००९–२०१० :**

२१ डिसेंबर २००९ रोजी मावळी मंडळ क्रीडांगणावर क्रीडादिन साजरा करण्यात आला. इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थांसाठी खालील स्पर्धा होत्या.

*वैयक्तिक स्पर्धा* – ६० मि, १५० मि, ३०० मि, ६००मि, धावणे स्पर्धा; उंच उडी, गोळा फेक, थ्रो बॉल

*सांधिक स्पर्धा* – रिले रेस, डॉज बॉल, लंगडी

**आनंदमेळा २००९–२०१० :**

शनिवार, १६ जानेवारी २०१० रोजी शाळेत आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक वर्गाचे स्टॉल होते.

इ. ५ वी – ६ वी : विविध खेळ

इ. ७ वी ते ९ वी : विविध खाद्यपदार्थ

तसेच स्काऊट, गाईड, इंटरॅक्ट क्लबचे ही स्टॉल होते. काही पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वतः केले होते. सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी आनंद मेळ्याचा आनंद घेतला.

**ठाणे जिल्हा गणित प्रावीण्य परीक्षा २००९–२०१० :**

| | इ. ५ वी | इ. ८ वी |
|---|---|---|
| परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी | २५ | ०३ |
| उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | २९ | ०३ |

| इयत्ता | ५ वी | ८ वी |
|---|---|---|
| विशेष प्रविण्य | ३ | ० |
| प्रथम श्रेणी | ७ | २ |
| द्वितीय श्रेणी | ४ | ० |
| तृतीय श्रेणी | ५ | १ |

**प्रज्ञा परीक्षेसाठी निवड झालेले विद्यार्थी :**

इ. ५ वी – १) श्रीहरी बोडस, २) ऋषिकेश बोडस, ३) ओमकार साठे

**दहावी निरोप समारंभ :**

२९ जानेवारी रोजी इ. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. आमच्या शाळेत दरवर्षी निरोप समारंभ वेगळ्या प्रकारे साजरा केला जातो. शाळेच्या मुख्याध्यापिका कोल्हटकरबाई यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच अपयश आले तरी निराश न होता धैर्याने त्याला सामोरे जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर जादूगार मधुगंधा इंद्रजित काटकर यांच्या जादूच्या प्रयोगांचे विद्यार्थ्यांसाठी खास आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनीही त्यात सहभाग घेतला आणि कार्यक्रमाचा खूप आनंद घेतला. मनोरंजक जादूच्या प्रयोगांनंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. शिक्षकांचे आशीर्वाद घेऊन विद्यार्थी जड अंत:करणाने आपापल्या घरी परतले.

**डॉ. अजय ताम्हाणे यांची पालकांसाठी कार्यशाळा :**

दि. २३ जानेवारी रोजी इ. ९ वीच्या पालकांसाठी तसेच दि. ३० जानेवारी २०१० रोजी इ. १० वीच्या पालकांसाठी डॉ. अजय ताम्हाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानाचा विषय होता 'मानसिक तणावांचे व्यवस्थापन'. सद्य परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या बरोबरच पालकांनाही समुपदेशनाची अत्यंत गरज असल्यामुळे ह्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. ताम्हाणे यांनी पालकांना आपल्या पाल्याशी कसे वागावे याच्या काही सूचना केल्या. घरातले वातावरण अभ्यासाला पोषक असे असले पाहिजे. घरात कटकटी, भांडणे यांना थारा नसावा. पालक आणि पाल्य

यांचा मोकळा सहज संवाद असला पाहिजे. पालकांनी पाल्याच्या वागणुकीकडे, त्यांतील बदलांकडे पाल्याच्या नकळत बारीक नजर ठेवली पाहिजे. त्याच्या अभ्यासात रस घेतला पाहिजे. आपल्या पाल्याच्या आहाराविषयी जागरूक असले पाहिजे. सात्विक आणि पुरेसा आहार दिला गेला पाहिजे. मुलांना योगा किंवा त्यासारख्या व्यायामाची गोडी लावली पाहिजे. त्यामुळेच त्यांची मानसिक आणि शारिरीक जडण घडण चांगली होऊ शकेल. मुलांच्या मनावर कुठल्याही गोष्टीचा ताण येईल असे पालकांचे वागणे नसावे. मुलांमधे आत्मविश्वास निर्माण करावा. थोडक्यात पालक आणि विद्यार्थी यांच्यात सुसंवाद असेल. आपल्या पाल्याला समजून घेऊन पालकांनी योग्य दिशा दाखवली तर तणाव आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे बऱ्याच प्रमाणात निराकरण करणे शक्य होईल. पालकांनी व्याख्यान आवडल्याची पोच दिली.

**कु. नेहा दिक्षित – इ. ६ वी :**



१) जानेवारी २ आणि ३, २०१० रोजी कालिदास स्पोर्टस् कॉम्प्लेक्स येथे आयोजित १३ वर्षा खालील मुलींच्या गटात राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा – विजेती.

२)जानेवारी २३ आणि २४, २०१० रोजी नॅशनल स्पोर्टस् क्लब, वरळी येथे आयोजित मनोरा बॅडमिंटन स्पर्धेच्या १३ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेती.

३) जानेवारी ३० आणि ३१, २०१० रोजी माटुंगा जिमखाना येथे आयोजित मनोरा बॅडमिंटन स्पर्धेच्या १३ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेती.

४) २००९ ते २०१० या शैक्षणिक वर्षात दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे झालेल्या बॅडमिंटन पात्रता फेरीत आंतरशालेय विभागीय स्तरासाठी पात्र.

**विद्या प्रसारक मंडळ :**

महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात २३ व २४ जानेवारी रोजी मंडळाने स्वरोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात शनिवारी सौ. अश्विनी भिडे – देशपांडे यांचे शास्त्रीय गायन व रविवारी श्रीमती फैयाज, श्री. प्रल्हाद अडफडकर व सौ. नीलाक्षी पेंढारकर यांचे नाट्यसंगीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नरेंद्र बेडेकर यांनी केले.

• • •

### अतिथी देवो भव

अतिथीला देव मानावे, अशी भारतीय संस्कृतीतील शिकवण आहे. तैत्तिरीय उपनिषदातील 'मातृदेवो भव...' या उपदेशपर वचनात 'अतिथिदेवो भव' हा उल्लेख आहे. 'अतिथ्य' शब्दाचा अर्थ पाहुणचार.

पाहुणा ज्याच्याकडे आलेला असतो, तो 'यजमान'. उर्दूमध्ये यजमानाला 'मेजबान' आणि पाहुणचाराला 'मेजबानी' म्हटले जाते. हे दोन्ही फारसी शब्द आहेत. फारसीतून ते मराठीत आले. त्यातील 'मेजबानी' शब्द 'मेजवानी' या रूपात आज रूढ आहे. 'बा' चा 'वा' झाला आणि दंततालव्य 'ज' तालव्य झाला.

'मेजबानी' चा मूळ अर्थ मराठीत बाजूला पडून 'थाटाचे भोजन' असा अर्थ रूढ झाला. मात्र सणासुदीला जे मिष्टान्नभोजन असते, त्याला मेजवानी म्हणत नाहीत. मेजवानी 'दिली' जाते; तर पाहुणचार 'केला' जातो व पाहुण्यांकडून तो 'घेतला' जातो.

संग्रहातून

मुखपृष्ठावरून
संपादकीय
**सुरुवात स्वत:पासून करू या!**

की, अनेक रीतिरिवाज, जीवनमूल्यांच्या संकल्पना व त्यांतून निर्माण झालेली समाजव्यवस्था ही अशा परिपक्व अनुभवप्रक्रियेचा एक परिपाक असते.

शिक्षण म्हणजे दुसरे तिसरे काही नसून जीवन जगण्याच्या, स्वत:बरोबर इतरांचे जीवन सुसह्य करण्याच्या कार्यशैलीचा हेतुपुरस्सर प्रयत्न असतो. हा प्रयत्न अनेक माध्यमांमधून साध्य होत असतो. शालेय, महाविद्यालयीन व तत्सम अनौपचारिक वाहिन्यांतून दिले जाणारे शिक्षण हे त्याचे एक माध्यम आहे, ते सर्वस्व नाही. तसेच हे शिक्षण त्यापुरते सीमितही नाही. ‘खरे बोला’ हे शिक्षण शाळेत एक उक्ती म्हणून मिळते. पण, त्याचे खरे शिक्षण हे आईवडील, गुरुजन, समवयस्क मित्र, यांच्या प्रत्यक्ष आचारणातून मिळते. यालाच आपण संस्कार म्हणतो. संस्कारित होणे हा शिक्षणाचा सर्वांत मोठा हेतू असावयास हवा.

दुर्दैवाने आजचे ‘शिक्षण’ हे शिक्षकाची शैक्षणिक पात्रता, पगार, परीक्षा, अनुदान, शुल्क, त्यांची अनेक स्तरांवरील नियंत्रणे यांमध्ये गुरफटलेले दिसते. या यांत्रिक उपचारांची तीव्रता उबग येईल इतकी वाढत चालली आहे. आजची ही सर्व यंत्रणा भ्रष्ट, अकार्यक्षम, स्वार्थी व्यक्ती व नेतृत्वाच्या हाती गेली आहे. आदर्श समाजनिर्मिती करायची तर सर्व जीवनमूल्यांना समाजरचनेत आज हरताळ फासला जात आहे. लाचारी, लांगुलचालन करणे, हेकेखोरी, स्वातंत्र्याच्या नावाखाली अनिर्बंध स्वैराचार हे सर्व आज ‘गुण’ होऊ पाहत आहेत. साहजिकच नीतिमान वागणूक, नि:स्वार्थीपणा, प्रसिद्धीपासून दूर राहून काम करणे, त्याग ही सर्व मूल्ये हद्दपार होताना दिसत आहेत. या मूल्यांचे कोणी पालन केले तर त्याला शिक्षा होईल अशी योजना करण्यात आली आहे. या परिस्थितीत परीक्षा पद्धती, शिक्षणाचा दर्जा यांत बदल करून मूलभूत बदल घडून येणार नाहीत. त्यासाठी आज गरज आहे ती कणखर, अप्रिय होण्याची तयारी असणाऱ्या नेतृत्वाची. दुर्दैवाने कोठलेही नेतृत्व समाजामधूनच निर्माण होते. आज दिशाहीन, सवलतग्रस्त व स्वार्थी बनत चाललेल्या समाजामधून असे नेतृत्व जन्माला येईल ही अपेक्षा बाळगणे चूक आहे.

प्रश्न आहे तो यावर पर्याय काय हा! यावर पर्याय फक्त आपण स्वत: आहोत. जे दुसऱ्याने करावे असे आपल्याला वाटते त्याची सुरुवात आपण स्वत:पासून करायला हवी. समाजात अशा कार्यकर्त्यांची संख्या जेव्हा वाढेल तेव्हाच याही प्रश्नांना उत्तरे मिळण्याची शक्यता निर्माण होईल, ‘शिवाजी जन्माला यावा पण दुसऱ्याच्या घरात...’ ही वृत्ती आपण त्यागली पाहिजे. नाहीतर शिक्षण म्हणजे शाळा, अनुदान, परीक्षा, भ्रष्ट नोकरशहांच्या मदतीने चालणारे राज्यशकट, नियंत्रणे... या सर्वांची आवर्तने, अशीच व्याख्या होईल. या दुष्टचक्राचा भेद आपणच करायचा आहे, हे मनाशी पक्के करावे लागेल!!

• • •

**दिशासाठी**

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञात क्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**



# स्वप्न साकारत आहे...

*(१ ऑगस्ट हा आमच्या विद्या प्रसारक मंडळाचा
स्थापना दिन. त्या निमित्ताने)*

*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*
*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

*- डॉ. वा. ना. बेडेकर*

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.